परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र
# हितगुज
अंक ११७ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ मार्च २०१९
Website : www.marathepratishthan.org
(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

*प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना*

*माझा सस्नेह नमस्कार.*

हितगुज डिसेंबर २०१८ चा अंक आपण म.प्र.चे कै. रमाकांत विद्वांस स्मृती विशेषांक प्रकाशित केला होता. त्यामुळे श्रद्धांजलीपर लेखांनी वाहिलेला असे त्याचे स्वरूप होते. आजही या अंकाद्वारे पुलवामा येथे दहशतवादी हल्ला झाला आणि आपले सैनिक शहीद झाले त्या सैनिकांना समस्त मराठे परिवारातर्फे श्रद्धांजली वाहाण्याची वेळ आपल्यावर आली यासारखे दुर्दैव नाही. नुसत्या मेणबत्त्या लावून, श्रद्धांजली फलक लावून, दुकाने, बाजार बंद करून भागण्यासारखे नाही. तर देशभरात संतापाची लाट उसळली पाहिजे. शत्रूला चोख प्रत्युत्तर दिले पाहिजे. 'जशास तसे', आक्रमणाला प्रत्याक्रमणाने उत्तर दिले पाहिजे. दहशतवादाची शिकार न होता, बलि देना नही, बलि लेना चाहिए' याप्रमाणे वागून दहशतवादी कारवायांचे सत्र कायमचे नष्ट करून टाकले पाहिजे. देशद्रोही, फुटीर प्रवृत्तीचा समूळ नायनाट केलाच पाहिजे असे झाले तरच ती खरी हुतात्मा जवानांना श्रद्धांजली ठरेल. असो.

मंडळी, २०१९ मधला मार्च महिन्याचा हा हितगुजचा पहिला अंक निघत आहे. वसंत ऋतूला प्रारंभ झाला आहे. भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णाने 'ऋतूंना कुसुमाकर' ऋतूंमध्ये मी वसंत आहे असे म्हणून वसंतऋतूचा गौरव केला आहे. वसंतपंचमी पासून वसंतोत्सवात सुरुवात होते. कामदेव मदनाचा जन्म याच दिवशी झाला म्हणून दांपत्यजीवन सुखाचे जावे यासाठी लोक रति-मदनाची पूजा व प्रार्थना करतात.

या अंकात, काकूने कर्तृत्ववान पुतण्याला लिहिलेले पत्र हृदयस्पर्शी आहे. बडोद्याचे ज्येष्ठ कुलबांधव व श्री. सदाशिव बळवंत मराठे यांचे ॲडजस्टमेंट (तडजोड) भाग १ व ॲडजस्टमेंट भाग २ हे दोन अकृत्रिम ललित लेख उत्तम आहेत. श्री. गोविंद नारायण मराठे लिखित 'सुटाबुटातील चोर' मध्ये प्रवासातील चोरीचा कटू अनुभव सांगितला आहे. वसंतऋतू सुरू आहे तेव्हा राजा भर्तृहरीने वर्णन केलेल्या शृंगार शतकातील स्त्रीची शृंगारलक्षणे हा आस्वादक लेख आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीत स्वयंपाकातील अन्नपदार्थांचा उपयोग आपल्या निरुपणात कसा केला आहे ते 'पाकनिपुण ज्ञानेश्वर' या लेखात वाचायला मिळते. पुस्तक परिचय, साभार पोच, आरोग्यं धनसंपदा, हसरे हितगुज, सुविचार संवाद कुलबांधवांशी, पुणे शाखेचा वर्धापनदिन, संचिता वृत्त इ. सर्व साहित्य वाचनीय आहे.

श्री. नीरज हेमंत मराठे यांची यशोगाथा कौतुकास्पद, प्रशंसनीय आहे. 'कुलवृत्तांत एक आव्हान' हा श्रीनिवास मराठे यांनी लिहिलेला लेख अभ्यासनीय, कुलवृत्तांताचे महत्त्व सांगणारा उत्तम असा आहे.

सर्व कुलबांधवांना होळी व गुढीपाडव्याच्या शुभेच्छा.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. २७ फेब्रुवारी २०१९)

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचा वर्धापन दिन

• एअर कमोडोर (नि.) श्री. मधुकर कृष्ण मराठे (पृ. ३८६), पुणे, अध्यक्ष मराठे प्रतिष्ठान पुणे शाखा

दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेच्या वर्धापन दिनाचा समारंभ कोथरुड मधील त्रिदल सभागृह, झाला सोसायटी कर्वे रोड येथे सायंकाळी ५ ते ९ या वेळेत साजरा झाला.

सुरुवातीला सर्व कुलबांधव आणि भगिनीचे स्वागत सौ. आसावरी मराठे यांनी चाफ्याची फुले तसेच मराठ्यांची माहेरवाशिण सौ. मानसी गाडगीळ हिने तयार केलेल्या सुरेख खुसखुशीत तिळगुळ वाटून केले.

सौ. अंजली आणि मंजिरी मराठे यांनी गणेशवंदना सुस्वरात सादर करून या वार्षिक समारंभाचा शुभारंभ केला.

प्रतिष्ठानच्या पुणे शाखेचे कार्याध्यक्ष एअर कमोडर मधुकर मराठे यांनी आपल्या स्वागतपर भाषणांत 'मराठे प्रतिष्ठान'चे दिवंगत कार्याध्यक्ष कै. रमाकांत जी विद्वांस आणि इतर दिवंगताना श्रद्धांजली वाहण्याची सर्वाना विनंती केली व त्या प्रमाणे सर्वानी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली. त्या नंतरच्या भाषणात 'प्रतिष्ठान'च्या उपक्रमाची माहिती देऊन सर्वांना आवाहन केले की सभासद वृद्धीसाठी सर्वानी प्रयत्न करावा व त्यासाठी पुण्यनगरीतील सर्व मराठे कुटुंबियांना पर्यंत आपण पोहोचणे आवश्यक आहे. प्रतिष्ठानच्या आर्थिक वृद्धी होण्यास साहाय्य करण्यासाठी सर्व सभासदांनी पुढे यावे असे आवाहनही त्यांनी केले.

पुणे शाखेचे खजिनदार गजानन मराठे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमासाठी मुंबई हून मुद्दाम आलेले 'प्रतिष्ठान'चे कार्याध्यक्ष श्री. सि. गो. खांबेटे यांनी मनोगत व्यक्त करताना काही महत्त्वाच्या सूचना केल्या.

मुख्य आकर्षण म्हणजे श्री. मोहन मराठे, पुणे यांच्या स्नुषा सौ. प्राची मराठे यांच्या सुगम संगीताचा कार्यक्रम होय. या वर्षी महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व कै. पु. ल. देशपांडे तसेच ख्यातनाम संगीतकार व गायक श्री. सुधीर फडके तथा बाबुजी, आणि मराठीचे वाल्मिकी म्हणून प्रसिद्ध झालेले श्रेष्ठ कवी श्री. ग. दि. माडगूळकर यांच्या जन्म शताब्दी वर्ष निमित्त सौ.प्राची मराठे यांनी तीनही दिग्गजांची प्रसिद्ध गाणी सादर केली. निवेदन आणि गाण्याच्या साथीला निखिल हिरुरकरने छान साथ दिली, तबल्याची साथ प्रसिद्ध आदित्य आठल्ये तर हार्मोनियमची सुरेल साथ अनय इनामदार यांनी केली. कलाकारांचा सत्कार प्रतिष्ठानचे जेष्ठ संस्थापक सदस्य श्री अरूण मराठे यांनी श्रीफळ व गुलाब फुलं देऊन केला.

श्रीकृष्ण मराठे आणि शेखर विद्वांस यांनी सभासदांनी दिलेल्या देणग्या स्वीकारून योग्य ती पावती देण्याची महत्वाची जबाबदारी पार पाडली.

या कार्यक्रमाला आपले विश्वस्त श्री. मोहनराव मराठे (बडोदा) आवर्जून उपस्थिती होते. तसेच मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीचे कार्यवाह, व कोषाध्यक्ष तसेच प्रतिष्ठानचे मुखपत्र 'हितगुज'च्या संपादिका सौ. सुमेधाताई व भूतपूर्व कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर मराठे हेही मुंबईहून आवर्जून आले होते. एक विशेष म्हणजे कार्यवाह श्री. हेमंत मराठे मुंबई मॅरेथॉन यशस्वीपणे पूर्ण करून आवर्जून उपस्थित होते. त्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन. आपले जेष्ठ सभासद वयोवृद्ध रिटायर्ड जेलर श्री चक्रदेव हे देखील सपत्निक उपस्थित होते.

शेवटी अल्पोपहाराचा आस्वाद सर्वांनी घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

◆




उभे एअर कमोडोर (नि.) मधुकर मराठे भाषण करताना, खुर्चीवर बसलेले श्री. सी. गो. खांबेटे, श्री. गजानन मराठे




गायिका सौ. प्राची मराठे, गायक-निवेदक श्री. निखील हिरूरकर, तबला श्री. आदित्य आठल्ये, पेटीवर श्री. अनय इनामदार

# संवाद कुलबांधवांसाठी

• श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९५७

नमस्कार, कुलबांधव व भगिनींनो,

सध्या हे सदर लिहितांना १४ फेब्रुवारी २०१९ या दिवशी घडलेल्या पुलवामा घटनेची दृश्य वारंवार डोळ्यासमोर येत आहेत. या अशा घटना अधूनमधून घडवून पाकिस्तान आपण हिंदुस्तानचे शत्रु आहोत हे दाखवून देत असते.

महत्त्वाचे हे आहे कि तो शत्रूच आहे व त्याने कधीही ते लपवले नाही मग आपली कृती कशी असायला हवी? माझ्या मते फक्त सैन्याने लढून लढाई पुरी होत नसते तर देशातील जनतेने देखील आपली कर्तव्ये पार पाडावी लागतात. आपल्याकडे काय होतं कि अशी कोणतीही घटना घडली की आपलं देशप्रेम उफाळून येतं व मग रोष प्रकट होतो, मात्र तो रोष चुकीच्या पद्धतीने व्यक्त केला जातो, याचं उदाहरण म्हणजे काल काही ठिकाणी झालेला रेलरोको, आपण हे करून आपल्याच देशाचं नुकसान करतो आहोत याची जाण कधी येणार?

दुसरं असं की या शत्रुराष्ट्राला सैन्यदल योग्य ते उत्तर देईलच परंतु आपण एक विचार करायला हवा कि जेवढं नुकसान पाकिस्तान करत नाही त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक नुकसान आपणच आपलं करत असतो, कसं ते पहा. गेल्या पन्नास जाऊदे, पाच वर्षांत घडलेल्या घटना पाहिल्या तरी हे लक्षात येईल. उदाः वारंवार होत असलेली जातीतील भांडणे, वेगवेगळ्या जाती जमातींनी आरक्षणासाठी केलेली आंदोलने व त्यावेळची जाळपोळ व हिंसा, शेतकरी आंदोलने तसेच त्याहीवेळची जाळपोळ व हिंसा व आत्महत्या, याचबरोबरीने गावात, शहरात होत असलेले विविध गुन्हे, गोहत्या संशयावरून दंगे, विद्यार्थी आंदोलने व दंगे या व अशा विविध घटनांमध्ये कितीतरी माणसे आपला जीव गमावून जातात. आंदोलनांमध्ये गाड्यांची जाळपोळ, रेल्वेचे नुकसान केले जाते, यामध्ये देशाच्या संपत्तीचाच नाश होतो हे कोणाच्याच लक्षात येत नाही. राजकारणी कार्यकर्त्यांच्या जीवावर पोळी भाजून घेतात. थोडक्यात सांगायचे तर आपले शत्रू आपण स्वतः च आहोत. तेव्हा प्रत्येक नागरिकाने आपल्या कामाप्रती निष्ठा ठेवून प्रामाणिक पणे काम करणे, सार्वजनिक जागी नियम पाळणे या गोष्टी जर केल्या तर शत्रू हजारवेळा विचार करेल आक्रमण करताना, कारण आपण सर्व जण एक राष्ट्र म्हणून पुढे येणार असू तर शत्रूला भीतीही वाटणारच. आपलं लष्कर पाकिस्तानला उत्तर द्यायला समर्थ आहे परंतु देशाची जनता ही देखील सक्षम असणं आवश्यक आहे. असो, आज जरा वेगळा विचार परीस्थितीला अनुसरून लिहिला आहे.

मंडळी २० जानेवारी २०१९ ला पुणे येथे म.प्र.चा वर्धापनदिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला. मुंबई येथून कार्याध्यक्ष, कार्यवाह, कोषाध्यक्ष तसेच हितगुजच्या संपादिका त्याचबरोबर बडोदा येथून विश्वस्त देखील उपस्थित होते. पुण्यातील उपस्थिती ही चांगली होती.

आपणास सांगण्यास आनंद होत आहे कि आपला मराठे परिवाराचा १९९२ साली कुलवृत्तांत छापला होता, त्यानंतर गेल्या २७ वर्षातील पुढील पिढ्यांची नोंद झालेली नाही कारण आता कुलवृत्तांत छपाई शक्य होणार नाही त्यामुळे नवीन तंत्रज्ञान वापरून जेणेकरून संगणकावर नोंदी करून पुढील कित्येक वर्षापर्यंत नवनवीन नोंदी आपण करू शकू. यासाठी आपण एक आधुनिक सॉफ्टवेअर घेत आहोत ज्यामुळे हे सर्व शक्य होईल. आता याच्या नोंदी करणारे कार्यकर्ते आपणास संपर्क करतील त्यांना आवश्यक ती माहिती आपण द्यायची आहे व यथावकाश आतापर्यंतच्या सर्व नोंदी झाल्यानंतर आपल्या प्रतिष्ठानच्या वेबसाइट वर आवश्यक ती खबरदारी घेऊन आपणा सर्वांना पहाता येईल.

आपणा सर्वांच्या सहकार्याने आम्ही नवनवीन गोष्टी करण्याचा प्रयत्न करत आहोत, आपले सहकार्य असेच मिळत राहील हा विश्वास ठेवून आपली रजा घेतो.

◆

भक्ती हेचि भावे परब्रह्म पक्वान्न।
गुरुसुखे जेवण जेववितो ।।१।।

अनुभव मात लय लक्ष कढी।
जेवणारा गोडी घेत असे ।।2।।

सुख शांती शाखा भावार्थ हा वडा।
जेवणारा गाढा आत्माराम ।।3।।

दया क्षीरधारी शांति पूर्णपोळी।
घृत हे वळ्ळोळी प्रेम माझे ।।४।।

विषयाचा गुरळा थुंकोनि सांडिला।
नामा आंचवला संसारासी ।।५।।

# कुलवृत्तांत - एक आव्हान

• श्रीनिवास अनंत मराठे (पृ.३९२), कोषाध्यक्ष (म.प्र), दादर भ्रमणध्वनी – ९८३३२१६४६८

प्रत्येक मराठी माणसाला व प्रामुख्याने प्रत्येक मराठी ब्राह्मणाला 'कुलवृत्तांत' म्हणजे काय हे सांगावं लागणार नाही किंबहुना सांगावं लागू नये. परंतु इतरांच्या माहितीसाठी : 'कुलवृत्तांत' म्हणजे एखाद्या आडनावाच्या (किंवा ज्ञातीच्या) व्यक्तींनी त्यांच्या अस्तित्वासाठी व उत्कर्षासाठी केलेल्या प्रयत्नांचा, वंशवृद्धीचा आणि यशाचा, त्यातील व्यक्तींची गेल्या काही वर्षांची माहिती संकलित करून केलेला आलेख. हा आलेख, वंशावळ किंवा 'फमिली tree' या स्वरुपात असून त्यात असलेल्या व्यक्तींची उपलब्ध माहिती, त्यांच्या यशाचा व कर्तृत्वाचा परिचय कुलवृत्तांताद्वारे पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरावा हा त्यामागचा उद्देश असतो. काही सन्माननीय अपवाद वगळता कुलवृत्तांत ही चित्पावनांची मक्तेदारी किंवा खरी ओळख आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कोकणातील आगमनानंतर त्यांच्या वसाहती ज्या ज्या ठिकाणी झाल्या ती ठिकाणे ही 'घराणी'. अशी वस्ती वसवणारी पहिली व्यक्ती किंवा मागील पिढ्यांची माहिती ज्ञात नसेल तर अशी व्यक्ती ही घराण्याचा 'मूळ पुरुष' कल्पून त्याच्या पुढील पिढ्यांतील वंशजांची माहिती त्या घराण्यात समाविष्ट होते. जवळजवळ गेल्या २००/२५० वर्षांची ही माहिती त्र्यंबकेश्वर (नाशिक) व इतर ठिकाणी श्राद्धादी विधी करणाऱ्या पुरोहितांकडून गेल्या ७०/८० वर्षात विविध चित्पावन कुळांनी परिश्रम पूर्वक गोळा केली व ती कुलवृत्तांत स्वरुपात प्रसिद्ध केली.

या कालावधीत समाज रचनेत झालेली स्थित्यंतरे, बदलते जीवनमान, बदलती जीवनशैली, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांतील स्थित्यंतरे, धार्मिक व सामाजिक तसेच सरकारी धोरणात्मक बदल व त्यांमुळे अर्थार्जनाची बदलती साधने आणि स्वतंत्र व्यवसायाकडे वाढलेला कल, बालविवाह प्रथेच्या त्यागाने दोन पिढ्यांतील वाढलेलं अंतर, तसेच कुटुंबनियोजनाचे महत्त्व जाणून त्याचा अंगीकार केल्याने त्याचा लोकसंख्या वाढीवर झालेला परिणाम आदींची नोंद कुलवृत्तांतात व्यक्तींच्या माहितीद्वारे आपसूकच होत गेली. या दृष्टीने पाहता कुलवृत्तांत म्हणजे समाजशास्त्रज्ञांसाठी माहितीचा एक खजिनाच आहे. शिवाय कायदेशीररित्या मान्यता नसली तरी वारसा हक्क प्रस्थापित करण्यासाठी देखील कुलवृत्तांताचा आधार घेता येऊ शकावा.

युरोपमध्ये गेल्या २५/३० वर्षांत आपल्या पूर्वजांविषयी जाणून घेण्याची उत्सुकता किंवा माझं मूळ कुठे आहे या बाबत बरीच जागरूकता किंवा कुतूहल निर्माण झालं. याची परिणती म्हणून अनेक संकेतस्थळे अस्तित्वात आली. मानव वंश शास्त्र म्हणजेच Geneology शी संबंधित या संकेतस्थळावर कोणालाही आपली वंशावळ (Family Tree) सुरू करता येते. अमेरिका इंग्लंड येथील जनगणनांचे अहवाल, मृत्यू व दफन विधींची वेगवेगळ्या चर्चमधील कागदपत्रे व माहिती उपलब्ध झाल्याने ही वरवर पाहता किचकट वाटणारी पूर्वजांच्या शोधाची प्रक्रिया काही प्रमाणात सुकर झाली आहे. legacy.com, ancestry.com, wikitree.com, myheritage.com, myfamilytree.com, usgenweb.com आदी अशीच काही संकेतस्थळे.

मात्र आपल्या भारतातील चित्र मात्र निराशाजनकच आहे विशेषतः महाराष्ट्रातील. कुलवृत्तांतातील माहितीचे संकलन, तक्ते बनवणे, विश्लेषण आणि छपाई आदी कार्यात मागील २/३ पिढ्यांतील व्यक्तींनी खूपच परिश्रम घेतले. जोड पोस्टकार्ड पाठवून किंवा दळणवळणाची साधने उपलब्ध नसतांनाही लोकांच्या भेटीगाठी घेऊन, त्यांच्या या बाबतीतील उदासीनतेचा सामना करीत, प्रसंगी पदरमोड करून व त्यांचा रोष पत्करूनही. पण माहिती मिळवण्यासाठी त्यांनी घेतलेल्या अतुलनीय परिश्रमांमुळेच माहितीचं हे भांडार पुढील पिढ्यांसाठी उपलब्ध झालं आहे. इतक्या प्रतिकूल परिस्थितीशी यशस्वी सामना करून मिळवलेल्या माहितीपुरतंच हे मर्यादित नव्हतं. विशेषतः संगणकीय सहाय्य उपलब्ध नसतांना आपल्या मराठे कुलवृत्तांताच्या अखेरीस छापलेल्या शैक्षणिक, व्यावसायिक विश्लेषणात्मक तक्त्यांच्या अचूकतेवरून या कामातील त्यांची या कार्याविषयीची निष्ठा, समर्पित वृत्ती आणि चिकाटी यांची प्रचीती येईल. काहीशी अशीच उदासीनता अलीकडील काळातही दिसून येते. पण आता ह्या कामासाठी इतक्या चिकाटीची गरज नाही. आज आपली/आपल्या कुटुंबातील व्यक्तींची माहिती, त्यांच्या यशाविषयी माहिती कुळातील इतर व्यक्तींना व्हावी यासाठी घरबसल्या facebookद्वारे संगणकावरून, अगदी मोबाईल वरूनही (whatsapp द्वारे) अशा माहितीचे आदान प्रदान शक्य झाले आहे.

बऱ्याच चित्पावन कुळांनी या बदलत्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून आपापले कुलवृत्तांत web-database स्वरुपात प्रसिद्ध

करण्याचा संकल्प केला आहे. काही कुळांनी या पूर्वीच त्यांचे कुलवृत्तांत अशा प्रकारे गेल्या वर्षभरात उपलब्ध केले आहेत. सुमारे दोन अडीच वर्षांपूर्वी घाटकोपर येथील विश्वास मराठे या उद्योजकांच्या माहितीतील एका गुजराती व्यक्तीनं बनवलेल्या comutree.com या संकेतस्थळाविषयी माहिती मिळाल्यावर त्यांच्याच कार्यालयात त्या व्यक्तीशी भेट होऊन त्याचा Demo पहिला होता. या संकेतस्थळाद्वारे व नंतर त्याच नावाच्या app द्वारे, गुजराती समाजातील १००च्या वर ज्ञाती एकत्र येऊन आपसात व्यवहार करीत आहेत. योग्य तो developer न मिळाल्यानं गेली ५/६ वर्ष बासनात बांधून ठेवलेल्या प्रकल्पाच्या पुर्णत्वाविषयी या संकेतस्थळामुळे आशा निर्माण झाली. मात्र Data Securityच्या कारणास्तव त्या संकेतस्थळावर आपला कुलवृत्तांत असणे अयोग्य वाटलं. सर्व चित्पावन कुळांचे असे सर्व कुलवृत्तांत एकमेकांशी जोडता आल्यास अनेक चित्पावन कुळांतील माहितीचे आदानप्रदान ते आपापसात करू शकतील जसं या गुजराती समाजातील व्यक्ती यशस्वीपणे करीत आहेत. त्यामुळे चित्पावनांचे आपसातील विवाहसंबंध, व्यावसायिक संबंध जोडण्याच्या प्रक्रियेला चालना मिळणार आहे. येणारा काळ चित्पावन ज्ञातीसाठी भयावह नसला तरी कठीण जरूर आहे. त्यामुळे ५/६ पिढ्यांनंतर कुलवृत्तांत या संकल्पनेचे महत्त्व वाढलेले असेल. आज परिस्थिती अशी आहे की आपल्या पणजोबांची तर सोडाच पण आजोबांची माहितीही नातवंडांना नसते. अशा परिस्थितीत या संधीचा फायदा आपण जर आज घेतला नाही, तर मधल्या काही पिढ्यांच्या माहितीचा ऱ्हास होऊन एक पोकळी निर्माण होईल. मग ७/८ पिढ्यांनंतर होणाऱ्या रोषांचे खापर आपल्या माथी येईल.

आपलं प्रतिष्ठान या दिशेनं कार्यरत आहे. मराठ्यांच्या कुळात मराठे या आडनावाव्यतिरिक्त चक्रदेव, खांबेटे, विद्वांस, जोशी, जाईल, रटाटे तसेच फडणीस या कपि गोत्री चित्पावन ब्राह्मण व्यक्तींचा समावेश आहे. आपला कुलवृत्तांत प्रथम १९४५ साली प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर दुसरी आवृत्ती १९९२ साली प्रसिद्ध झाली ज्यात १९८९ पर्यंत जन्मलेल्या व्यक्तींची माहिती आहे. त्यानंतर आता २५ वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला आहे. म्हणजे आपण जवळ जवळ एक पिढी पुढे आलो आहोत. पण या पिढीच्या कर्तृत्वाची नोंदच झालेली नाही. आपल्या १९९२ साली प्रसिद्ध झालेल्या कुलवृत्तांतातील सर्व माहिती PDF फाइल्सच्या स्वरुपात आपल्या marathepratishthan.org या संकेतस्थळावर सध्याही उपलब्ध आहे. पण लवकरच म्हणजे ५/६ महिन्यात web-database स्वरुपात मराठे कुलवृत्तांत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचा मानस आहे, ज्याद्वारे कुलवृत्तांतातील माहिती प्रवाही म्हणजे dynamic होईल. एका clickच्या सहाय्याने आपली पूर्ण माहिती, facebook वरील प्रोफाईल प्रमाणेच, आपल्या स्वतःच्या मराठे कुलवृत्तांतात देता येईल. तसेच आपल्यातील व्यावसायिक मंडळी, कुलवृत्तांतातील प्रस्तावित Yellow Pages या संकल्पनेद्वारे अत्यल्प खर्चात आपल्या व्यवसायाविषयी कुलाबांधावांना परिचित करून देऊ शकतील. नवीन पिढीचा आपल्या माहितीच्या गुप्ततेबाबत असलेला कल लक्षात घेऊन जन्मवर्ष, संपर्क क्रमांक (मोबाईल/ईमेल) आदी बाबत गुप्तता पाळण्याची देखील खबरदारी घेतली जाईल. उपलब्ध माहितीचे १) जीवित/मृत व्यक्ती, २) पुरुष/महिला व्यक्ती, ३) विवाहित/अविवाहित व्यक्ती, ४) वयोमानानुसार (पुरुष/स्त्रिया) ५) शैक्षणिक पात्रतेनुसार, ६) व्यावसायिक पात्रतेनुसार, ७) नोकरी/पेशानुसार, ८) सौर राशी नुसार आदी विविध प्रकारे विश्लेषण/वर्गीकरण शक्य होईल. तसेच उपरोक्त सामाजिक आर्थिक स्थित्यंतरं यांचाही मागोवा घेणं शक्य होईल. या धर्तीवर कुलवृत्तांत बनविल्यास उपलब्ध माहितीचा विनियोग आपल्याला व्यवसायिक सल्ला/ सहाय्य/विवाह संबंध आदीसाठी सुद्धा करता येईल, ज्याद्वारे इतर ज्ञातींप्रमाणेच आपण आपसात व्यावासायिक संबंध देखील वाढवू शकू. अशा अनेक प्रकारचे विश्लेषण/सुविधा आपल्या कुलबांधवांना उपलब्ध करून देणे शक्य होईल व ते तसे करून देण्याच्या दृष्टीने web-developerशी बोलणी चालू आहेत. त्यात यश आल्यास आपला कुलवृत्तांत या वर्षाखेरीस आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी आपल्याला समन्वयक (Co-ordinator) आणि Admin या नात्याने काम करणाऱ्या व्यक्तींची गरज आहे. मराठे प्रतिष्ठानचे सभासद मुंबई, ठाणे-डोंबिवली, पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, सांगली, रायगड, कुलाबा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हे तसेच म.प्र.तील इंदोर, गोवा, गुजरात मधील वडोदरा तसेच कर्नाटक राज्य आदी ठिकाणी विखुरलेले आहेत. सर्वात जास्त सभासद मुंबई आणि पुणे मिळून प्रत्येकी ३२०/३०० एवढे आहेत. हे सभासद तसंच सभासद नसलेल्या पण मराठे कुळातील इतर लोकांपर्यंत पोहोचून त्यांना कुलवृत्तान्त या संकल्पनेविषयी जागरूक करून आपली तसेच आपली कुटुंबीयांची माहिती कुलवृत्तान्त समाविष्ट करण्यासाठी उद्युक्त करण्यासाठी समन्वयक या नात्याने काम करणाऱ्या व्यक्तींची तसेच त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीचं validation करण्यासाठी Admin या नात्याने काम करणाऱ्या व्यक्तींची जरूर पडेल.

तसेच, कुलवृत्तांतात अगोदर पासून असलेल्या माहितीचे संकलन EXCEL Fileमध्ये करून तो Data संकेतस्थळावर upload

करण्यासाठी तयार करणे हेही एक काम आहे. असे Data-Entry काम करणाऱ्या व्यक्तींना त्यासाठी योग्य तो मोबदला दिला जाऊ शकतो पण समन्वयक Admin आणि ही पदे मानद (honorary) असतील. मात्र उत्तम काम करणाऱ्या समन्वयकांना प्रोत्साहन म्हणून भरघोस पारितोषिके देणे विचाराधीन आहे. विशेष महत्त्वाचे म्हणजे कुळाचे कार्य म्हणून कोणी विना मोबदला हे काम करण्यासाठी तयार असेल तर त्याचे स्वागतच आहे. आपल्या कुलवृत्तांतात सध्या १०२०० पुरुष व्यक्तींची माहिती आहे. व सुमारे १५००० स्त्रियांची (पत्नी व मुली) नावे (माहेर व सासरची) आहेत. एकूण जवळपास २५००० व्यक्तींच्या माहितीचे संकलन करावे लागेल. यापैकी केवळ दीड ते दोन हजार पुरुष व्यक्तींची माहिती काहीशा विस्तृत स्वरूपात असेल तर उर्वरित पुरुष व्यक्तींची अतिशय जुजबी माहिती असेल आणि बहुतेक सर्वच स्त्रियांची माहिती केवळ पतीचे नाव, आडनाव व राहण्याचे ठिकाण यापुरतीच मर्यादित असेल. या तीन पैकी कुठल्याही प्रकारे आपल्याला या प्रकल्पाशी जोडलं जाण्याची इच्छा असेल तर मी (श्रीनिवास ९८३३२१६४६८), हेमंत (९२२०६९९९५७), शैलेंद्र (९८२०४०४५५४), DK (९९७७६००१०१), उपेन्द्र (९९६७५८४५५७), विजय (९४२३०११९४९), राहुल विद्वांस (९५९४०३८४३७), श्रीपाद (९५८८६९९९३८) किंवा पदाधिकाऱ्यांपैकी इतर कोणाही व्यक्तीशी आपण संपर्क साधू शकाल.

समन्वयक किंवा Admin हे काम आठवड्याला फार तर एक-दोन तास असू शकेल. अर्थात त्यांचं काम, अस्तित्वातील कुल वृत्तांतातल्या माहितीची Data Entry पूर्ण झाल्यानंतरच सुरू होईल. त्याला अजून ८/९ महिने तरी लागतील असा कयास आहे. आपल्याला मुंबई, ठाणे/डोंबिवली, पुणे येथे प्रत्येकी २, नाशिक, नागपूर, मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्र, गोवा, इंदोर (MP), गुजरात, कर्नाटक यासाठी प्रत्येकी १ तर कोकण विभागासाठी ३ व्यक्तींची जरूर आहे. (एकूण १७) तसेच Admin या नात्याने काम करण्यासाठी सुमारे चार ते पाच व्यक्तींची गरज आहे.

व्यक्ती तरुणच हव्यात असे नाही पण उत्साही नक्की असाव्यात. १९९२ साली प्रसिद्ध झालेला आपला मराठे कुलवृत्तांत हा जसा महत्त्वकांक्षी प्रकल्प होता तसाच आता आंतरजालावर interactive पद्धतीने बनवला जाणारा हा कुलवृत्तांत देखील एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प असेल. सुमारे २१ जणांनी या ना त्या प्रकारे आपला सहभाग असेल असे कळविले आहे त्यामुळे एक शुभशकुन तर झाला आहेच. पण नाशिक, विदर्भ, मध्यप्रदेश, कर्नाटक येथून मात्र अजूनही प्रतिसाद आलेला नाही. मोबाईलच्या वापरामुळे संपर्क करणे हे फार जिकीरीचे कार्य नसले तरी त्या त्या प्रदेशातील व्यक्ती असल्या तर परस्पर ओळखींमुळे अधिकाधिक मराठे मंडळींपर्यंत पोहोचता येऊन त्यांना उद्युक्त करणे सोपे जाईल असा कयास आहे. या प्रकल्पाबरोबर जोडले जाण्यासाठी आपण उत्सुक असालच. तर मग आमच्याशी लवकरात लवकर संपर्क साधावा ही कळकळीची विनंती. त्यामुळे या प्रकल्पाचे पुढील आरेखन करणे सोपे जाईल हे सांगायला नकोच. धन्यवाद.

◆

# वाचकांचा पत्रव्यवहार

## असामान्य अष्टपैलू व्यक्तिमत्व कै. श्री. रा. रमाकांत विद्वांस

या व्यक्तिमत्वासाठी आधारस्तंभ किंवा दीपस्तंभ हेच शब्द उत्तम ठरतील असे वाटते या दोनच शब्दांमध्ये संबध त्यांचे व्यक्तिमत्वाचे पैलू समजतात.

एखाद्याचे गुण कौशल्य समजून घेणे व त्याला एकाद्या कोंदणात सर्वार्थाने बसविणे व त्या व्यक्तीला आयुष्य फुलवण्यास सर्वार्थाने मदत करणे सोपे नाही पण या व्यक्तिमत्वाने अशा तऱ्हेने कित्येकांना आयुष्यात उभे केले आहे आणि तेही कोणालाही कळू न देता.

आमच्या सर्वच नात्यांचा आधारवडच होता तो! अर्ध्या रात्री पाठीशी उभे राहणे. एखाद्याला नैराश्यातून बाहेर काढणे ही फार मोठी कला असणारे हे व्यक्तिमत्व फारच नम्र होते. केलेली मदत कोणालाही न सांगता मनात ठेवणे ही फार अवघड गोष्ट लीलया पेलली होती. सदैव उत्साही. 'नाही' हा शब्द आपल्या शब्दकोशातच नसणारी अशी ही व्यक्ती जिने आयुष्यात जगभरात फिरून उत्तम कामगिरी करून कित्येक वर्षे गोष्टी कायमच उभ्या केल्यात ज्यांमधून त्यांची स्मृति सबंध जगभर उजळत राहील.

ते दादरला आपल्या घरी आहेत आणि त्यांचा फोन चालू आहे या आधारावर त्यांचे जेष्ठ नातेवाईक एका विश्वासाने झोपत असत. मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून त्या माध्यमातून खूपच समाजोपयोगी कार्य त्यांनी केलेली आहेत.

त्यांच्या अखेरच्या आयुष्यातील सर्वच मदतनीसांना त्यांनी कृतज्ञतेच्या भावनेतून इतकी मदत केली आहे की त्यांच्या पुढील आयुष्याची चिंताच मिटवून टाकली आहे आणि याच गोष्टीचे खरेतर आम्हांस कौतुक वाटते.

हा आमचा मावसभाऊ पण सख्या मोठ्या भावासारखा त्यांचा आधार होता. म्हणूनच दादा असण्याचा अभिमान.

**– डॉ. विजया पेठे**

# मी संजय झालो तर!...

• श्री. संजय रामचंद्र मराठे, अमरावती भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

शाळेत असताना त्यावेळी आपल्याला, मी मुख्यमंत्री झालो तर? मी शेतकरी झालो तर..., मी नदी झालो तर, मी मुख्याध्यापक झालो तर!, अशा विविधप्रकारच्या ''जर...तर'' विषयावर निबंध लिहायला सांगायचे. नावामुळे असेल कदाचित, पण महाभारतातील ''संजय'' हे माझे आवडते पात्र.

भगवत्‌गीता श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितली पण ती आपल्यापर्यंत पोहोचली ती, संजय धृतराष्ट्राला महाभारतातील कौरव-पांडवाच्या युद्धाचा वृतांत त्याला प्राप्त झालेल्या दिव्य दृष्टीने सांगत होता, त्यामुळे. त्यामुळे गीता आपल्याला कोणी सांगितली हा प्रश्नही गहन आहे. श्रीकृष्णाने अर्जुनाला तो हातपाय गाळून बसला होता तेव्हा त्याला युद्धासाठी उचकावण्या करता गीता सांगितली, ती संजय ने प्रत्यक्ष सांगताना पाहून आणि ऐकून धृतराष्ट्राला सांगितली. आपल्याला कोण सांगणार? कारण गाढवापुढे वाचली गीता.. आपण म्हणणार कालचा गोंधळ बरा होता.

तरी पण महाभारतातील आणि गीतेतील संजय हे माझे आवडते व्यक्तिमत्त्व. मी संजय या पात्राचा मागोवा घेण्यासाठी महाभारतावर उपलब्ध झालेले अनेक ग्रंथ महाभारतातील कर्ण, कृष्ण, अर्जुन, द्रौपदी, कुंती, दुर्योधन, अश्वत्थामा ह्यांना हिरो म्हणून रेखाटलेल्या विविध ग्रंथकारांचे ग्रंथ/कादंबऱ्या ह्यांचाही धांडोळा घेतला. व्यासांना हिरो कल्पून लिहिलेले ''व्यासांचा वारसा'' ही वाचले पण ह्या सर्वांतून तीच ती आणि अतिशय त्रोटक माहिती मिळाली. संगणकांवरील मंत्र मायाजाल ही उघडून पाहिले त्यातही खूप खूप शोधले. अगदी संगणक उलटा-तिलटा करून त्याला चापट्या मारूनही पाहिले पण त्यातूनही काहीच पाझरले नाही.

शोधलं म्हणजे सापडतं असं एका वाहिनी वरची खाजगी गुप्तहेर नेहमी म्हणायची. मला वाटतं की, ही बया येवढं छाती ठोकपणे सांगते तर आपल्यालाही सापडेल! पण माझी बौद्धिक संशोधन अस्मिता कमी पडली असावी. मग मीच माझा निर्णय घेतला, की आपल्या हाती जे काही लागलं आहे त्यात कल्पना विकासाची भर घालून आपणच संजय रंगवायचा, उभा करायचा. ''थोडा है थोडे की जरूरत है'' असं लोकं म्हणतील तर म्हणू देत, आणि मग ठरले. मी संजय झालो तर... आणि मग काय! संजय उवाचं... म्हणत सांगत सुटलो.

लहानपणी मला एक कविता होती. त्यात एक कडवं होतं,

''आई तुला दाखवू का बाळ होऊन,
घाल बरे मांडी घेतो जरा लोळून.''

या कवितेप्रमाणे श्रीकृष्णाला म्हटले, ''कृष्णा सांग बरे जरा आधुनिक गीता. घेतो जरा ऐकून, आणि सांगतो सगळ्या आंधळ्या धृतराष्ट्रांना संजय उवाचं म्हणून.''

संजयने गीतेसोबतच प्रत्यक्ष युद्धभूमीवरील घटना जशा घडत होत्या त्या तशाच्या तशा अंध राजा धृतराष्ट्राला सांगितल्या. युद्धात हळू हळू कौरवांचा विनाश होत होता. खरं तर युद्ध करण्याला जेवढा दुर्योधन जबाबदार होता, तेवढाच धृतराष्ट्र होता. खरे तर युद्ध टाळू शकत होता, थांबवू शकत होता. पण सत्ता लालसेने लोलुप झालेल्या आपल्या मुलाच्या पाठीशी धृतराष्ट्र खंबीरपणे उभा राहिला आणि त्याच्या प्रत्येक चुकीच्या कृतीला पाठीशी घालीत राहिला. आज एक हेच करत आहे. आपल्या युवराजाला तिच्या पाठीराख्याकडून पुढे केलं जातंय, ढकललं जातंय, दामटलं जातंय. कारण शेवटी तो ही युवराजच. गादीवर घराणेशाहीच्या परंपरेप्रमाणे त्याचा हक्क, युद्धात दुर्योधन भीमा करवी मारला गेला हे वृत्त धृतराष्ट्रास सांगितले. खरंतर दुर्योधनाची पापंच एवढी होती की त्याचे मरणे ठरलेलेच होते आणि भीमाने कमरेखाली मांडीवर गदेचा प्रहार करून त्याला मारले कारण तशी त्याने प्रतिज्ञाच द्युताच्या प्रसंगी केली होती. अर्थात ह्या सर्वांचे स्मरण करून देण्याचे काम संजयचे नव्हतेच. त्याने आपले जे दिसले, घडले, ते सांगितले. पुत्र प्रेमाने अंध झालेल्या आणि मुळात सर्वच बाबतीत अंध असणाऱ्या धृतराष्ट्राच्या मनात येवढेच ठासले गेले की, त्याच्या स्वतःच्या प्राणाहून प्रिय असणाऱ्या पुत्राला, दुर्योधनाला भीमाने मारले आणि तो हे मुळीच विसरला नाही. युद्ध संपल्यावर पाचही पांडव जेव्हा धृतराष्ट्राला भेटायला गेले, आणि एक एक करून त्याच्या पाया पडले. जेव्हा भीमाची वेळ आली तेव्हा श्रीकृष्णाने भीमाचा लोखंडी पुतळाच पुढे केला. धृतराष्ट्राने त्यालाच भीम समजून घट्ट मिठी मारली आणि आपल्या ताकदीने पूर्णपणे आवळून चिरडून टाकले. प्रत्यक्ष भीम असता तर निश्चितच चिरडून मेलाच असतां. पण हे सर्व श्रीकृष्णास प्रतिस्मृती योगामुळे आधीच दिसले होते. म्हणून त्यानी भीमा ऐवजी पोलादी पुतळा पुढे केला. संजयलाही ही दृष्टी आणि प्रतिस्मृतीयोग विद्या व्यासांनी दिली होती. पण त्याची ही विद्या तात्कालिक होती तो फक्त वर्तमानातलेच बघू शकत होता. श्रीकृष्ण आणि व्यास ह्यांना ही दृष्टी अशी होती की ते भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या तीनही काळातले पाहू शकत होते. हीच दृष्टी लेखातल्या संजयला असती तर तो या काळातील

निर्ढावलेल्या सत्ता लोलुप झालेल्या, आंधळेपणाचे सोंग घेतलेल्या धृतराष्ट्रांचे बिंग फोडू शकेल का असाही विचार हे लेखन करता करता मनात येतोय.

''हिंदुस्थान''च्या इतिहासात ''मालटेकडीच्या माथ्यावरून'' एक ''पीरबाबा'' तत्कालिन राजकीय आणि सामाजिक घडामोडींवर तथाकथित संभावितांच्या डोळ्यात ''सुरमा'' म्हणून चांगलं झणझणीत अंजन घालायचा. तसेच विविध प्रकारच्या सत्तेने अंध असलेल्या धृतराष्ट्रांच्या डोळ्यात सुरमा घालायला पाहिजे पण बंगपाच्या स्वार्थाने मिटलेल्या डोळ्याप्रमाणे स्वार्थ साधल्याशिवाय थोडीच ते डोळे उघडणार? भले किलकिल्या डोळ्यांनी पण घारीच्या दृष्टीने बघून ससाण्याप्रमाणे अलगद झडप घालणारं. म्हणून आपले संजय उवाचं आहे की, आहे हे असे आहे. असं घडलं/घडतांना बघितलं अन् सांगितले. निर्णय/निष्कर्ष तुमचे, तुम्ही बघा अन् ठरवा. मग ते दुर्योधनाचे रणांगणावरील मरण आणि त्याचा फॉलोअप असो की भीमाच्या कोरेगावची दंगल अन् तिचा फॉलोअप. कोरेगाव अन् दंतेवाडा उगाच बादनारायणी संबंध आणि निष्कर्ष काढणे संजयचे काम नव्हे. कौरवांकडेही भीष्म, विदुरांसारखी अनेक सत्शील माणसे होती. अश्वत्थामाही सत्शील होता. पण त्यांनी असत्याची बाजू कां घेतली? शेवटी अश्वत्थामाने एवढे अघोरी कृत्य का केले? संजय हा कौरवांकडचा होता पण तो सत् असत् या चक्रव्युहात कधीच अडकला नाही म्हणून माझ्या मते तोच नायक. पांडवांच्या पक्षात तर सर्व आनंदी आनंदच. कृष्ण वजा केला तर तिकडे काहीच उरत नाही अगदी शून्यसुद्धा. कारण शून्यालाही अस्तित्व असतं. शून्यातून विश्व उभं राहते म्हणतात.

महाभारतातील महायुद्धाच्या आधी अर्जुन आणि दुर्योधन दोघेही श्रीकृष्णाकडे युद्धासाठी मदत मागण्याकरता गेले. दुर्योधनाने श्रीकृष्णाचे संपूर्ण सैन्य मागितले आणि अर्जुनाने फक्त श्रीकृष्णालाच स्वत:कडे मागून घेतले. परिणाम सर्वांना ज्ञात आहेच. हाच संदर्भ पकडून आजचा संजय म्हणतो, असंच काहीसं नुकतच भारतात क्रीडा क्षेत्रात घडलं. जकार्ता आशियाडसाठी म्हणजेच नुकत्याच झालेल्या एशियन गेम्ससाठी सरकारने विविध क्रीडा संघटनांकडे खेळाडूची चाचपणी केली. म्हणजे एका अर्थी चांगले खेळाडू मागितले म्हणाना. या क्रीडा संघटनांकडे इतर देशांचे आणि त्यांच्या क्रीडा तज्ञांचेही बारीक लक्ष होते. नुकतंच असं वाचण्यात आलं की, जे चांगले खेळाडू त्या त्या संघटनांकडून नाकारले जाण्याची शक्यता होती किंवा आधीच्या स्पर्धात जे निवडले गेले नव्हते, म्हणजेच त्या-त्या देशांकडून अधिकृतपणे खेळणार नव्हते, त्यांना वर्ष सहामहिने आधीच आपल्या संघातर्फे खेळण्यासाठी काही देशांच्या संघटनांनी आणि सरकारी मुत्सद्यांनी आपल्या देशाचे नागरिकत्व देऊन खेळवले आणि विशेष म्हणजे या खेळाडूंनी आपल्या मूळ देशाच्या खेळाडूंना हरवून पदके मिळवली. संजयच्या दिव्य दृष्टीला इथे नमूद करण्यासाठी एक खास उदाहरण दिसले. तर अर्जुनाच्या भारतात (किंवा महाभारतात) कबड्डीच्या महिला खेळाडू आणि प्रशिक्षकांची निवड करण्यासाठी त्यांच्या पाठीराख्यात तू-तू-मै-मै चा सामना चांगलाच रंगला. महाराष्ट्राच्या एका चांगल्या प्रशिक्षकाला भारतीय महिला संघाच्या प्रशिक्षक पदासाठी निवडलं गेलं नाही. इराणचे ह्या घटनेकडे आणि तिच्या क्षमतेकडे पूर्ण लक्ष होते. तिला त्यांनी त्यांच्या देशाच्या महिला संघाला प्रशिक्षण देण्यासाठी आमंत्रित केले आणि या महिलेने जिद्दीने त्यांच्या संघाच्या प्रशिक्षणाची जबाबदारी उचलली आणि लीग आणि फायनल दोन्ही वेळा भारतीय महिला संघाला हरवून इराणला सुवर्णपदक मिळवून दिलं आणि भारत हरण्याचे महाभारत झाले. आता तुम्ही म्हणाल, क्रीडा आणि युद्ध ह्या भिन्न गोष्टी आहेत. पण आजकाल खेळ आणि क्रीडा सामने त्यातील चुरस कसंही करून जिंकण्याची दुर्दम्य लालसा, इर्षा, मत्सर यामुळे निर्मळ आनंद आणि मनोरंजनासाठी राहिले नसून जिंकण्यासाठीचे युद्ध झाले आहे. विशेषत: भारत आणि पाकिस्तान यांच्यातील कोणत्याही खेळाचा सामना हा खेळ व क्रीडा प्रकार न राहता एक प्रकारचं युद्धच ठरू लागले आहे. स्तर आणि सामना कोणताही असो मनोरंजन आणि आनंद न वाटता हारजितच्या भितीने छातीत धडधडायला लागते, टेन्शन येऊ लागतं आणि खेळाडूही खिलाडुवृत्ती मनात न बाळगता खुन्नस ठेवून खेळतात की काय असे वाटते.

आटपाट नगरीतील आमच्या या भरतच्या भारताला प्रथमच एक क्रीडापटू हा क्रीडामंत्री म्हणून लाभला आहे. नुसता क्रीडापटू नाही तर चक्क ऑलिंपिक रौप्य पदक विजेता. अशा या अर्जुन अवार्ड विजेत्या अर्जुनाने काल्पनिक की वास्तविक ते माहिती नाही पण श्रीकृष्णाने सांगितलेल्या तत्त्वज्ञानाला अनुसरून एक विधेयक तयार केले आहे आणि लवकरच ते संसदेत मांडून आणि संमत झाले की एक नियमित विधीनियम तयार करण्याचा घाट घातला आहे. काही लोक याला कुटील डाव म्हणतील, आपण कृष्णनिती म्हणूया. या ठरावाचा मसुदाही सोशल मिडियावर आल्याचे कळले, संजयने अनाहुतपणे आजच्या राजकारणी धृतराष्ट्रांना जे काही दिसतंय ते सांगितले आहे. त्यांच्यासाठी संजय उवाचं: या नियमात परावर्तीत होऊ घातलेल्या विधेयकात असे आहे की- कोणत्याही सभागृहाच्या सभासद असणाऱ्या आजी- माजी सदस्यांना कोणत्याही क्रीडा संस्थेच्या राष्ट्रीयपासून ते अगदी तालुका स्तरापर्यंत कोणतेही पद किंवा पदभार स्विकारता येणार नाही. तसेच विशिष्ट वयानंतर कोणत्याच संघटनेत कोणतेच पद भूषवता येणार नाही. आता आली की नाही पंचाईत! वर्षानुवर्षे एखाद्या नव्हे तर अनेक क्रीडा संघटनांना वंशपरंपरागत गोचिडासारखे चिटकून बसलेले सर्व अबालवृद्ध पितामहं प्रपितामहं वयोवृद्ध तपोवृद्ध धुरंधर म्हणतील की राजकारणात आमचा हात

धरणारे कोणी नाही. त्यांचा हा समज हे विधेयक पास होऊन खोटा न ठरो! आता अर्जुनाने गांडीव उचलले आहे, लवकरच कळेल की कोणा पितामहांना बाणाची शय्या मिळते आणि कोणाला मोक्ष. एकमात्र खरं या क्रीडा क्षेत्रातील गोचीडीसम पदाधिकाऱ्यांचे काय होईल ते माहीत नाही. पण खेळात भारत खूपच प्रगती करीत आहे हे मात्र अगदी खरं. यंदाच्या जकार्ताच्या आशियन खेळात याची चुणूक दिसलीच आहे. या एशियाडमध्ये भारताने अनेक विक्रम केले आहेत. आतापर्यंतच्या एशियाडच्या इतिहासात सर्वाधिक पदके मिळवली आहेत. तेही पूर्वी पेक्षा जास्त क्रीडा प्रकारातून.

मध्यंतरी वॉटस्‌ॲपवर दाभोळकरांना उद्देशून एक कवितात्मक पोस्ट फिरत होती. त्याचा थोडक्यात मतीतार्थ होता की दाभोळकरांनी फक्त हिंदुधर्मीय लोकांच्याच अंधश्रद्धेवर टीका केली. त्यांना फक्त हिंदु लोकांचे देव-देव करणे, देवावर भरवसा, बाबाजींवर विश्वास ठेवणे या गोष्टी खटकल्या त्यांनी हिंदुंच्या अंधश्रद्धेवर टीका-टिप्पणी केली त्यांचा सातत्याने विरोध आणि निषेध केला. पण मुसलमानांबद्दल, ख्रिश्चनांच्याबद्दल, त्यांच्या धर्मात आणि समाजांत रूढ असणाऱ्या आणि ते लोक पाळत असलेल्या अंधश्रद्धेबद्दल दाभोळकर कधीच बोलले नाहीत. त्यांच्या अंधश्रद्धा त्यांना कधीच खटकल्या नाहीत. नवरात्रीच्या उपासाबद्दल त्यांनी टीका केली पण मुसलमानांचे रोझे ठेवणे त्यांना चालले. इतर धर्मीय आणि पंथीयांच्या अंधश्रद्धांबाबत त्यांनी सदैव मौन पाळले. यावर माझ्या एका मित्राने वॉटस्‌ॲपवरच छान कॉमेंट पोस्ट केली होती. त्याची एक वाक्याची पोस्ट खूपच बोलकी आहे. तो म्हणतो ''मी हसतो दुसऱ्याला, शेंबूड माझ्या नाकाला.''

संजय म्हणतो अशातर अनेक गोष्टी आणि प्रसंग महाभारतात आहेत. अश्वत्थामा मेल्याच्या वावड्या जेव्हा उठवण्यात आल्या, तेव्हा द्रोणाचार्यानी शहानिशा करण्यासाठी युधिष्ठीराला विचारले की, ''खरेच अश्वत्थामा मेला का?'' त्यावर युधिष्ठीर मोठ्याने ओरडला अश्वत्थामा मेला, आणि हळूच पुटपुटला ''हत्ती की माणूस कसं सांगू!'' महाभारतावर भाष्य करणाऱ्या अनेक विचारवंतांनी युधिष्ठीरांची निर्भत्सना केली आणि त्याला असत्य वचनी ठरवून टाकले. अर्थात या अर्धसत्य बोलण्याची शिक्षा म्हणून अंगठा गमावण्याची शिक्षा त्याने स्वर्गारोहणाच्या वेळी भोगली याची दखलही ते घेत नाहीत, आणि याच गुरू द्रोणाचार्यांनी अर्जुनावरच्या प्रेमापोटी ज्या एकलव्याला शिकवण्यास नकार दिला, त्याच एकलव्याने द्रोणाचार्याचा पुतळासमोर ठेऊन आणि त्यांनाच गुरू मानून धर्नुविद्येत अर्जुनापेक्षा श्रेष्ठ पारंगतता प्राप्त केली. त्याला कधीच धर्नुविद्येचे पाठ न शिकवणाऱ्या द्रोणाचार्यानी तो अर्जुनापेक्षा श्रेष्ठ धनुर्धर आहे म्हणून गुरुदक्षिणेत त्याचा बाण सोडायचा कणा असलेला अंगठा गुरुदक्षिणा म्हणून मागितला आणि एकलव्याने गुरुदक्षिणेच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी हसत हसत आपला अंगठा कापून दिला अशी विचित्र गुरुदक्षिणा मागितल्याबद्दल याच भाष्यकारांनी द्रोणाचार्यांना दुषणे देण्याचे टाळून फक्त एकलव्याच्या गुरुभक्तीचे गोडवे गायले.

भीमाने दुर्योधनाशी झालेल्या अंतिम युद्धात त्याच्या मांडीवर गदा प्रहार करून त्याचा जीव घेतला याबद्दल खुद्द बलरामाने भीमाने गदायुद्धाच्या नियमाचा भंग कला म्हणून त्याला दुषणे दिली. त्यावर ''भीमाचा नियमभंग दिसतो पण द्रौपदी वस्त्रहरणाच्या प्रसंगी दुर्योधनाने तिला आपली मांडी दाखवून त्यावर बसण्यासाठी खुणावले म्हणून भीमाने तशी प्रतिज्ञा केली आणि गदेने प्रहार करून मांडी फोडली'' हे कृष्णाला बलरामाच्या लक्षात आणून द्यावे लागले. पण भीमावर नियमभंगाचा ठपका ठेवतांना दुर्यो धनाने द्रौपदीच्या केलेल्या हीन प्रतारणेला या प्रसंगी बलराम सुद्धा विसरला होता की काय ते तोच जाणे.

महाभारतातील अश्वत्थामा ही व्यक्तिरेखा रेखाटणाऱ्या एका कादंबरीकाराने कृष्णाच्या कूटनीती (अनिती)च्या उदाहरणाचा पाढा वाचण्यासाठी काही पाने खर्ची घातली आहेत. हा भाष्यकार पुढे म्हणतो की पांडवांवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्यांच्यावर झालेल्या अत्याचाराचा प्रतिशोध घेण्यासाठी कृष्णानी प्रसंगी अवैध मार्गाचा अवलंब बेधडकपणे केला. खरे तर या अशा अनेक लेखक आणि भाष्यकारांच्या मते बारा वर्षांचा वनवास आणि एक वर्षाचा अज्ञातवास पूर्ण केल्यावरही धृतराष्ट्र युधिष्ठीराला राज्याचा हिस्सा देण्यास काचकुच करत होता आणि दुर्योधन तर सुईच्या टोकावर मावेल येवढीही जमीन देण्यास तयार नव्हता तेव्हा युधिष्ठीराच्या नेतृत्वात पांडवांनी कोर्टात जायला हवे होते असे म्हणायचे होते की काय असे वाटते. खालचे कोर्ट,

वरचे कोर्ट, सुप्रिम कोर्टमध्ये कितीही काळ केस चालेनाकां, पण न्याय मिळाला असता असे वाटत असावे. खरे तर संजयच्या मते या असल्या लेखक/भाष्यकारांनी त्यांचे चालले असते किंवा त्यांना व्यासांनी विचारले असते तर त्यांनी पांडवांना राज्य द्यायचे की नाही, दिले तर कोणता भाग द्यायचा ह्यासाठी पुन्हा एखादा आयोग नेमण्याचा सल्ला दिला असता, पण शेवटी पांडव पक्षाने शिष्टाईवर जास्त भर न देता हातघाईने युद्ध करण्याचा निर्णय घेतल्याने आणि युद्ध नुसतेच लादले नाही तर त्यात युद्धनीतीचे नियम पायदळी तुडवून कपटनीतीने युद्ध जिंकले असे यांनी स्वत:च कोर्टमार्शल करून पांडवांना दोषी ठरवूनही टाकले. म्हणून शेवटी ते म्हणतात की कौरवांचा जरी पराजय झाला तर पांडवांना जिंकूनही हाती काहीच पडले नाही. अनितीने जिंकले म्हणून पांडवांना नैतिक विजयाचाही आनंद ते मिळू देत नाहीत.

एकूण काय तर या युद्धात कौरव आणि पांडव दोघांपैकी कोणत्याही न्याय-अन्यायकारक कृत्यांचा कोणत्याही एका पक्षांचा दृष्टीकोन विचारात घेतला तर दुसऱ्या पक्षाचे पाठीराखे दुखावतात. त्यामुळे संजय जरी धृतराष्ट्राचा विशेष सेवक असला

तरी कोणाचाच पक्ष घेत नाही. तो फक्त दिसते ते आणि तसेच सांगतो म्हणूनच या संजय उवाचं मध्ये दाभोळकरांच्या एकाच धर्माच्या अंधश्रद्धेला टार्गेट करण्याचा किंवा भीमा-कोरेगाव आणि दंतेवाडा संबंध ह्यांच्यामुळे घडलेले महाभारत आणि कौरवपांडवांचे महाभारत यांचा परस्पर संबंधही मी स्पष्ट करणार नाही. कौरव-पांडव यापैकी कोणाच्याही दृष्टिकोनास खतपाणी घालत नाही नाही तर उद्या ''प्रेस''वर दगड यायचे, आणि खोलात जाऊन सोदाहरण सविस्तर स्पष्टीकरण दिले तर एखादी संशोधन संस्था आगीच्या भक्षस्थानी पडावायची! तो फक्त दिसते ते सांगतो त्यात त्याचे काहीही नाही. त्याचा दृष्टिकोन आणि मत स्पष्ट आहे की ''इदं न् मम.''

आता काही मागची, युद्धभूमीच्या आधीची दृष्ये संजयच्या स्मृति पटलावर पुन्हा उमटत आहेत. लाक्षागृह आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्यानंतर कालांतराने पांडव जेव्हा द्रौपदी स्वयंवराच्या दृष्यात प्रगट झाले, तेव्हा पांडवांना लाक्षागृहात भस्म करण्याचा डाव फसला आणि लाक्षागृहाच्या राखेत सापडलेले मृतदेह पांडवाचे नव्हते हे स्पष्ट झाल्याने कौरवांतील काहींचे धाबे दणाणले. वर वर त्यांना पांडव सुखरूप परतल्याचा आनंद दाखवावा लागला. आपापसात वाद नको म्हणून पांडव जेव्हा राज्यात स्वतंत्र हिस्सा मागू लागले (जणू काही वेगळा विदर्भ मागू लागले) तेव्हा दुर्योधन आणि त्याच्या सवंगड्यांची गोची झाली. त्यांनी राज्याचा तुकडा पाडण्यास स्पष्ट नकार दिला. तेव्हा धृतराष्ट्राने नावाप्रमाणे धूर्तपणे सर्वात निकृष्ट अशी कोणती जागा पांडवांना देता येईल ते शोधण्यासाठी एक आयोग नेमला आणि आयोगाने सुचवलेली खांडववनाची जागा आपल्या काहीच उपयोगाची नाही हे तो दुर्योधन आणि त्यांच्या कंपूला पटवून देण्यात थोडा यशस्वी झाला. शिवाय त्याने या टोळीच्या हे ही लक्षात आणून दिले की नागालोक आणि तिथले आदिवासी त्यांना तिथे टिकू देणार नाहीत. शिवाय राजा म्हणून धृतराष्ट्राकडे विशेष अधिकार होताच, तो वापरून त्यांनी पांडवांना खांडवनाचा भाग स्वतंत्र राज्य स्थापण्यासाठी दिला.

पांडवांनी श्रीकृष्णाच्या सल्ल्याने खांडवन जाळून बऱ्याच जणांचे शिव्याशाप घेऊन तिथे आपले स्वतंत्र राज्य आणि इंद्रप्रस्थ नावाची राजधानी स्थापन केली, युधिष्ठीरास राज्यभिषेक होऊन राजमुगुट मिळाला. यानंतर आपले वैभव आणि दरारा वाढवण्यासाठी पांडवांनी श्रीकृष्णाच्या सल्ल्याने राजसूय यज्ञ करण्याचा घाट घातला. कौरवांनाही मानाचे निमंत्रण धाडले गेले. मनात नसतांनाही पण वर वर खूषी दाखवत दुर्योधन, दु:शासन, शकुनी, कर्ण यांच्यासह इतर सर्व कौरव आणि ज्येष्ठ श्रेष्ठ सर्वच महापुरुष आले. युधिष्ठीरांने त्यांचा यथायोग्य मान सन्मान आणि आदरातिथ्य करून त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे जबाबदाऱ्याही सोपवल्या. अतिथींचे आदरातिथ्य करण्याची जबाबदारी संजयकडे सोपवण्यात आली असाही उल्लेख आहे. वरवर पाहता पांडवांच्या या यज्ञात दुर्योधन आणि त्यांचा कंपू सामिल झाला. पण नंतर तेथील वैभव, देदिप्यमान राजवाडे, विशेषत: मयासुराने स्थापन केलेले मयसभागृह, तिथे झालेली फजिती आणि अपमान यामुळे ते फारच खट्टू झाले. लवकरच त्यांनी युधिष्ठीराच्या मयसभेपेक्षाही भव्यदिव्य राजवाडा बांधून युधिष्ठीरास द्युताचे आमंत्रण दिले. त्याला नकार न देता युधिष्ठीर द्युतास बसला आणि पुढील महाभारत घडले.

या दृष्यात आणि भारतात घडलेल्या एका महत्त्वाच्या प्रसंगात संजयला खूप समानता आढळते, संजय उवाचं:-

आणिबाणी लादून विरोधकांना संपवण्याचा डाव भारतातील घराणेशाही राजवंशातील प्रशासकाने मांडला आणि त्यात बरेचसे यशही मिळवले. पण एकहाती सत्ता कायम स्वत:कडे करण्याचा त्या व्यक्तीचा डाव आणि प्रयत्न लोकशाही निवडणुकीत फसला, आणि कौरव-पांडव लवकरच मूळ भिन्न स्वभावामुळे आणि कौरवांच्या पांडवांशी असलेल्या हाडवैरामुळे वेगवेगळे झाले. कडबोळे तुटले आणि पुन्हा एकाधिकारशाही सत्तेवर आली. पुन्हा एकदा प्रयत्न झाला परत कडबोळाची सत्ता आली पण सत्ता लालसेच्या धुंदीत आणि मस्तीत पुन्हा देश एका चांगल्या नेतृत्वाला मुकला. महाभारतातही असेच व्हायचे दुश्मनाशी भांडतांना कौरव-पांडव एक आणि सत्ता भोगण्यासाठी भाऊबंदकीचे सतत हाडवैर आणि उभे दावे.

आदरणीय वाजपेयींच्या दु:खद निधनानंतर त्यांची एक कविता वॉटस्‌ॲपवर आली होती. ''द्रौपदी अब तुम ही तुम्हारी लाज बचाओं, अब भगवान नही आयेंगे।'' अशी ती कविता होती. संजयला आजच्या परिस्थितीत संपूर्ण स्त्री जातीला ओरडून सांगावेसे वाटते की बाई, गं, हे अगदी खरे आहे. आता स्वत:चे रक्षण स्वत:च करायला शीक. आता कृष्ण किंवा त्याचा दुत तुझे रक्षण करायला येणार नाही. महाभारताच्या वेळीही, भीष्माचार्य, कृपाचार्य, द्रोणाचार्य, विदुर सारखे धुरंधर विद्वान काहीच करू शकले नव्हते युधिष्ठीर आधी स्वत:स द्युतात लावून हरला होता, त्यामुळे त्याला द्रौपदीला डावावर लावायचा हक्कच उरत नाही ह्या साध्या संकेत आणि नियमाचा पाठपुरावाही ते करू शकले नाहीत. पटत नसूनही राजाश्रयाचा मिंधेपणा आणि एकनिष्ठेचे कारण करून ते सर्व गप्पच राहिले. कदाचित पुढील युद्धाचे स्फुलिंग चेतावण्यासाठी महाभारतकार व्यासांनाही ते आवश्यक वाटले असेल, पण जेव्हा पाणी डोक्यावरून जाऊ लागण्याची चिन्हे दिसू लागली तेव्हा त्यांनी श्रीकृष्णाकरवी द्रौपदीची लाज राखली.

आज प्रत्येकात दु:शासन उफाळून आली आहे, आजचे धृतराष्ट्रही मतलबी आंधळे आहेत, सर्व अवयवांचे डोळे करून ते तुझी बेअब्रु मिटक्या मारत पाहतील. स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध, अत्याचाराविरुद्ध आजही महाभारतातल्या प्रमाणे फक्त बघ्याची भूमिका घेतील. स्त्रीला मदत करण्याऐवजी,

वाचवण्याऐवजी आपापल्या भ्रमणध्वनीवर चित्रीकरण करतील. आज स्त्री अत्याचाराविरुद्ध शस्त्र उचलले जात नाही आणि उचलताही येत नाही, कोर्टात आवाज उठवावा लागतो आणि तिथे ज्याच्या जिभेची धार अधिक तेच ते जिंकतात, अत्याचार करणाऱ्यास अल्पवयीन ठरवले जाते आणि कठोर शिक्षेपासून अभय दिले जाते. आज ज्यांना अल्पवयीन ठरवले जाते, त्यावयात महाभारतात ते बाप बनत असतं, खोटं नाही. अल्पवयीन अभिमन्युस मिसरूढ ही फुटले नव्हते, तेव्हा त्याला चक्रव्युह भेदण्याच्या कामगिरीवर पाठवण्यात आले आणि जेव्हा तो कौरवातील कोणाच एकाला आटपेना तेव्हा द्रोण आणि कर्णासारख्या सहा धुर्त योद्ध्यांनी एकत्र येऊन कपटाने अभिमन्यूला ठार केले, त्यावेळी तो केवळ सोळा वर्षाचा होता. पण या अल्पवयीन अभिमन्यूची पत्नी त्यावेळी गर्भवती होती आणि तिच्या गर्भावर आपले ब्रह्मास्त्र सोडून अश्वत्थाम्याने आपले ब्रह्मास्त्र शांत केले.

महाभारतातील अठरा दिवसांचे महायुद्ध संपल्यानंतर कृष्ण आणि अर्जुन विहार करीत असतांना, अर्जुन कृष्णाला म्हणाला की जी गीता त्याने अर्जुनाला सांगितली ते ज्ञान तत्त्वज्ञान त्याला नीटसे आठवत नाही तेव्हा श्रीकृष्णाने ती परत सांगावी. यावर श्रीकृष्ण स्वत: देव असूनही म्हणतो त्याने तेव्हा जे काही सांगितले ते आता त्यालाही आठवत नाही, त्याने अर्जुनाला हातपाय गाळून शस्त्र खाली टाकून विमनस्क बसला होता तेव्हा त्याला युद्धासाठी प्रेरित करण्यासाठी गीता सांगितली. तेवढेच त्याचे टार्गेट होते. तू युद्धाला तयार झालास, माझा उद्देश पूर्ण झाला. त्यामुळे आता मलाही गीता नीटशी आठवत नाही. बाकी कुणाच्या लक्षात असणे शक्यच नव्हते आणि आजुबाजूचे बहुतेक सर्वच मारले गेले, त्यामुळे ते तत्त्वज्ञान श्रीकृष्ण आणि अर्जुनालाच स्मरत नाही तर इतर पामरांचे काय? संजयलाही काही आठवण्याचा प्रश्नच नव्हता. युद्धाचे लाईव्ह टेलिकास्ट पाहून घडणारे सर्व धृतराष्ट्रास कथन करण्याची जबाबदारी व्यासांनी संजयास दिली होती. शिवाय व्यासांनी त्याला स्पष्ट सांगितले होते की हे लाईव्ह त्याला फक्त एकदाच घडतांनाचेच वर्तमानातले त्याला दूरदृष्टीने दिसेल/ऐकू येईल. ह्याचे पुन्हा रिपीट टेलीकास्ट होणार नाही.

मग कृष्णानेच अर्जुनाला तोडगा सांगितला. कारण त्याने म्हटलेच होते की, ''न धरी शस्त्र करी मी, गोष्टी सांगेन युक्तीच्या चार!'' म्हणून मग श्रीकृष्णांनी महाभारतातील चौथी महत्त्वाची युक्तींची गोष्ट अर्जुनाला सांगितली, अर्थात कृष्णाने युद्धात शस्त्र हाती घेतले की नाही हा कौरवांच्या मते आणि असाधारण वाचकांच्या मते वादाचा मुद्दा आहे कारण एकदा भीष्मावर चिडून जाऊन त्यांनी अर्जुनाला त्यांच्या विरुद्ध उचकण्यासाठी शस्त्र हाती घेतले अर्थात ते खोटं खोटं होते असे काही भाष्यकार म्हणतात आणि दुसरा प्रसंग म्हणजे सुर्यास्तापूर्वी जयद्रथाला ठार मारीन नाहीतर अग्नीकाष्ठ भक्षण करीन अशी प्रतिज्ञा अर्जुनाने केली तेव्हा जयद्रथ असा लपुन बसला की अर्जुनाच्या दृष्टीस पडेचना. सुर्यास्त व्हायची वेळ झाली, पण त्यापूर्वीच श्रीकृष्णाने सुदर्शन चक्र सोडून सुर्यबिंब झाकोळून टाकले. सुर्यास्त झाला असे समजून अर्जुन अग्नीकाष्ट भक्षण कसे करतो ते पाहण्यासाठी जयद्रथ बिळातून बाहेर आला. श्रीकृष्णाने लगेच सुदर्शन चक्र मागे घेतलं आणि म्हटले, ''हा सुर्य! हा जयद्रथ, अर्जुन चालव बाण,'' त्यामुळे कृष्णाने शस्त्र करी धरलेच नाही हे भाष्यकारांना पटत नाही आणि युक्तीच्या चारच गोष्टी न सांगता श्रीकृष्णाने अनेक गोष्टी सांगितल्या, अगदी स्वत:च्या निर्वाणापूर्वी त्याने अर्जुनास परत गीता ऐकता यावी म्हणून शेवटची गोष्ट (युक्ती) सांगितली, श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले की, तू स्फटिकमय शंकराची आराधना कर. त्यांना प्रसन्न करून घे आणि वर मागून घे तोच तुला सांगू शकेल. कारण स्फटिकामध्ये अशी सुप्त शक्ती असते की ते वायुरूपातील ध्वनी शक्ती आकर्षून आणि त्यांना पकडून शब्द त्यात प्रगट करू शकते. शंकर प्रसन्न झाले तरच स्फटिकातील ही सुप्त शक्ती जागृत होईल. मग पुढील सर्व सिद्धता करून अर्जुनाने शंकराची तपश्चर्या केली. शंकर प्रसन्न झाले, स्फटिक कार्यरत झाले. ध्वनी लहरींना शब्दरूप आले. तीव्र बुद्धीच्या व्यासांनी ते शब्द ध्यानात ठेवले आणि आला स्टेनो. टायपिस्ट श्री गणेशास सांगून, त्यांच्याकडून लिहून घेतले आणि ही व्यास कथित श्रीगणेश लिखित भगवत गीता जी श्रीकृष्णाने प्रथम अर्जुनास सांगितली, जी संजयने प्रत्यक्ष सांगताना पाहून ऐकली आणि धृतराष्ट्राला सांगितली अशा रीतीने नंतर पुन्हा ध्वनी लहरीतून शब्द लहरीत प्रगट होऊन आपल्यापर्यंत पोहोचली. तरीपण अल्पमती (खरेतर निर्बुद्ध) माणसाला प्रश्न पडतो की आपल्यापर्यंत पोहोचलेल्या गीतेमध्ये ही धृतराष्ट्र उवाचं, संजय उवाचं, भगवान उवाचं, अर्जुन उवाचं कसे ही प्रश्नोत्तरी तर मूळ गीतेतली, ही यात कशी. तर ही दुसरी गीता म्हणजे हिला अनुगीता म्हणतात, त्यावरून मग पुन्हा गीतेची सुधारीत आवृत्ती काढण्यात आली ज्यांत धृतराष्ट्र, संजय, अर्जुन, श्रीकृष्ण यांच्यातील मूळ प्रश्नोत्तरीचा फॉरमॅट देण्यात आला.

अर्थात गीतेच्या सेकंड एडिशनची माहिती एका भाष्यकाराच्या ग्रंथांतून माझ्याकडे आली मग तिथून माझ्या ''मी संजय झालो तर! संजय उवाचं'' निबंधात मी लिहिले आहे. निबंध वाचून अभिप्राय दिला तरी चालेल! गुण किती ते नाही सांगितले तरी चालेल! कारण आपण अभिप्राय आणि गुण दिले नाही तरी आपण वाचल्याने काही घटका-पळे आपले मनोरंजन व्हावे याच उद्देशाने निबंध लिहिला आहे, कुणाच्या भावना दुखावण्यासाठी नाही. तरीही भावना दुखावल्या असल्यांस माफी असावी.

◆

# ॲडजस्टमेंट (तडजोड) - १

• श्री. सदाशिव बळवंत मराठे (पृ. ३८०), बडोदे
दूरध्वनी : ०२६५-२४२३०५५

अशोक आणि आशिताची ही पहिलीच भेट होती. त्यांची भेट अधिकृत होती अन् खाजगीही. अशोकची नोकरी सामान्य होती तर आशिता गरीब बापाची पण खूप सुस्वरूप मुलगी होती. बाहेर दोघांचे पालक ड्रॉईंग रूम मध्ये त्या दोघांची बाहेर येण्याची वाट बघत होते. खोलीतून बाहेर येताच त्यांनी दोघांची लग्न संमती सांगितली. पहिल्याच भेटीत ते एकमेकांच्या प्रेमात पडले होते. इकडे दोघांच्या पालकांच्या लग्नमुहूर्ताच्या चर्चा सुरू झाली.

साहजिकच अशोक-आशिताच्या गाठीभेटी सुरू झाल्या. थोड्याच दिवसाने दोघांचे लग्नही झाले. संबंधाने एकरूप झाल्याने आशिताच्या एक गोष्ट लक्षात आली व तसे तिने अशोकला सांगितलेही की, ''तू आयोजनपूर्वक काम करणारी व्यक्ती आहेस, आयुष्याबद्दल तुझे विचार स्पष्ट वाटतात. तुझी स्वप्नं तू साकार करशील असा विश्वास वाटतो आहे. साहजिकच अशोक सुखावला व म्हणाला'' तुला काय वाटतं आपण सारे जीवन ह्या भिकारी देशात जगायचं?'' आशिताने म्हटले ''भारतात न आवडणारं काय आहे?'' अशोकने अनेक उदाहरणे देऊन तिला पटविले व त्याच्या डोक्यातला प्लॅन तिला समजाविला. त्यावर आशिताने विचारले ''आपण कुठल्या देशात जावयाचे, इंग्लंड, अमेरीका, न्युझीलंड?'' अशोक म्हणाला ''ते तुला लवकरच समजेल.''

इकडे अशोकने त्याच्या अमेरिकेतील एका श्रीमंत, सुस्वरूप मित्राशी, संपर्क साधून त्याला भारतात बोलावून घेतले व आशिताशी ओळख करून दिली. इतकेच नव्हे तर त्याला आशिताला प्रपोज करण्यास पटविले. त्या तिघांचे फिरणे वगैरे चालूच होते. आशितानी लग्नास संमती दर्शविली- अशोकच्या प्लॅनप्रमाणे आशिता व तिचा नवरा, अशोकचा मित्र, अमेरिकेस रवाना झाले. प्लॅन प्रमाणे आशिताने दोन वर्षात अमेरिकेची सिटीझनशीप मिळाल्यावर नवऱ्याशी घटस्फोट मागून अलग होऊन निराळे व्हावयाचे व मग आशिता लग्नाची बायको ह्या नात्याचे कारण सांगून अमेरीकेत सिटीझनशीप मिळवून तेथेच दोघांनी रहायचे ठरले होते.

इकडे दोन वर्षे झाली व आशिताला सिटीझनशीप मिळाली. ह्या दरम्यान आशिता व नवरा ह्यांचे संबंध गाढ झाले व ती आता खरोखरच त्याच्या प्रेमात पडली होती. रममाण झाली होती.

दरम्यान दोन वर्षाचा काळ संपला व आशिताला सिटीझनशीप मिळताच अशोक तिला दररोज फोन करून प्लॅनची आठवण देऊन घटस्फोटाचे कुठपर्यंत आले म्हणून मागे लागला. अखेर एके दिवशी अशोकचा फोन कॉल आला तेव्हा तिने फोनवरच ''अशोक, सॉरी मी नवऱ्याशी घटस्फोट नाही घेऊ शकत. मी त्यालाच माझा नवरा म्हणून स्वीकारलाय. पुन्हा एकदा सॉरी'' असं म्हणून आशिताने फोन ठेवला व एक दीर्घ श्वास घेतला. ◆

---

# ॲडजस्टमेंट (तडजोड) - २

खेड्यात राहणाऱ्या सुशिलाबाईंना काही समजो वा न समजो पण परिस्थितीशी तडजोड करून घेणे त्या खूप तऱ्हेने करू शकत. त्यांनी कधीही कुणाहीविषयी तक्रार केली नाही. त्या स्वतःच्या कामात गर्क राहात असत. त्यांच्या मुलीला लहानपणापासून पोलीओ असल्याने ती व्हीलचेअरमध्येच मोठी झाली होती. सुशिलाबाई खूप शांतपणे वागत. मुलगी सुकन्या तीन वर्षाची होती तेव्हाच सुशिलाबाईंचे पति स्वर्गवासी झाले होते. तीन मोठे मुलगे आणि चौथी पोलिओ झालेली लहान मुलगी- सुकन्या. लोकांची लहान सहान कामे करून स्वकष्टाने त्यांनी तिन्ही मुलांना शिक्षण देऊन मार्गी लावले, त्यांची लग्नेही करून दिली. आजूबाजूच्या लोकांना सुशिलाबाईंचे खूप कौतुक वाटायचे. लोक म्हणत ''ही बाई हे सारे कशी काय करू शकते?''

सुशिलाबाई सुकन्याला सांगत ''सारे जण ज्याच्या त्याच्या नशिबाने पृथ्वीवर येतात. कुणी कुणाला सांभाळत नाही. ईश्वर सर्वांची काळजी घेतो. संध्याकाळी मुंगीलाही कण अन् हत्तीला मण मिळून जातो. ज्याने पोट दिले तोच ते भरतोही. सारेजण एक दुसऱ्याच्या अन्नपाण्याने जोडले जातात. ते संपले की सुटे पडतात. स्वतःच्या दुनियेत व्यस्त राहतात.'' अशा तऱ्हेने सुकन्येला समजावताना खाटेवर शांत झोपतात. सुकन्येला आईच्या साऱ्या गोष्टी आवडत. ''आई माझ्यापाशीच का साऱ्या गोष्टी करते कारण मी त्या मनापासून ऐकते'' असे तिला वाटे. मोठे भाऊ जेव्हा म्हणत की ''आई सुकन्येशीच जास्त बोलते'' तेव्हा ती म्हणे ''माझे आणि आईचे गतजन्मीचे संबंध असतील.''

एका मागे एक तीनही मुले आपापल्या पत्नी बरोबर स्वतंत्र

राहू लागली व तेही बाहेर गावी. इकडे आई आणि लेक दोघी खेड्यातल्या घरात राहू लागल्या. एक दिवस सुकन्याने आईस विचारले ''आपण त्या सगळ्यांशिवाय कसं राहू शकू?'' सुशिलाबाई हसून म्हणाल्या ''हळूहळू आपल्याला सवय होईल.''

मुलांचा अधूनमधून फोन यायचा. विचारपूस करायचे, तिन्ही मुले आळीपाळीने आईला पैसे पाठवत असत. पैसे कधी कमी जास्त आले तरी सुशिलाबाईनी मनावर घेतले नाही. सुशिलाबाईचे जीवन वयोमानानुसार खेड्यात सुकन्येबरोबर कष्टदायक होत गेले. व्हीलचेअरवर बसून सुकन्या आपल्या परीने होईल तेवढी आईची सेवा करण्याचा प्रयत्न करीत असे. अशा परिस्थितीत दिवस पसार करताना सुकन्येने न राहवून आपल्या भावांना खेड्यात बोलावून घेतले. घरातील परिस्थिती पाहून, आईला व बहिणीला कुणी सांभाळायचे ह्यावर चर्चा झाली. तिघांनी आळीपाळीने एकाने बहिणीला व दुसऱ्याने आईला सांभाळायचे असे ठरविले. इकडे सुशिलाबाई अंथरूणावर पडल्या पडल्या मुलांची चर्चा ऐकत होत्या. ''मला आईपासून वेगळे रहावे लागेल'' ह्या विचाराने सुकन्याही क्षुब्ध झाली. रात्रभर मायलेकीला बराच वेळ झोप लागली नाही. सर्वजण झोपल्याने घरात शांतता होती.

सकाळ लवकरच जाग येताच सुकन्याने आईला उठविण्यास आईजवळ गेली परंतु आईचे तोंड उघडे पाहून ती आईला हलवून उठविण्याचा प्रयत्न करीत होती पण आईकडून प्रतिसाद न मिळाल्याने तिने टाहो फोडून भावांना हाक मारली. सारे सुशिलाबाईंचे अंथरूणाजवळ उभे राहिले. पण सुशिलाबाई हा नश्वर देह सोडून कधीच निघून गेल्या होत्या. सुशिलाबाई झोपेतच स्वर्गवासी झाल्या होत्या. आईच्या नश्वर देहाला कवटाळून सुकन्याने खूप अश्रू ढाळले, तिच्या मनात एकच विचार येत होता की आईने रात्री झालेली मुलांची चर्चा ऐकून स्वतःच ही ॲडजस्टमेंट करून घेतली. ◆

# प्रकाशझोत



बडोद्याच्या सौ. सुषमा मोहन मराठे (पृ. ४२२) या माहेरच्या कु. ज्ञानेश्वरी महादेव जोशी. मराठी साहित्य वाचनाची अत्यंत आवड. कविता, मंगलाष्टके रचण्याचा त्यांना छंद. ३० वर्षांपूर्वी त्यांच्या मोठ्या वहिनींनी सौरभ भजन मंडळ सुरू केले होते. त्यात त्यांचा सक्रिय सहभाग असे. बडोद्यातील महिला भजन मंडळातील 'सौरभ भजन मंडळ' हे पहिल्या क्रमांकाचे नांव व स्पर्धेत बक्षिसे मिळवणारे असे हे मंडळ. बडोद्यात महिला सहकारी उद्योग मंदीर लि. ही संस्था 'भानूमती स्टोर्स' हे दुकान चालवते व ह्या संस्थेची गेल्या १८ वर्षापासून कार्यकारी सदस्य, सेक्रेटरी, उपाध्यक्ष, अध्यक्षा अशी विविध पदे भूषवित, सौ. सुषमा आजही कार्यरत आहेत. उत्तम गृहिणी आहेत. पाककलेत निपुण आहेत. पाककला स्पर्धेत परीक्षक म्हणूनही त्यांनी सेवा दिली आहे. संसार उत्तम सांभाळून, तीन मुलींना उत्तम संस्कार देऊन स्वतः निःस्पृहपणे समाजसेवा करतात. आजही उत्साहाचा खळखळता झरा अशा सौ सुषमा मराठे बडोद्यात होणाऱ्या प्रत्येक साहित्यिक उपक्रमास उपस्थित असतात. त्यांच्या सुखी, आनंदी व दीर्घायुष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

**भारताचा तडाखेबाज हवाई हल्ला पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर दि. २६ फेब्रुवारी २०१९ रोजी, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आत्मार्पण दिनी, मंगळवारी पहाटे झाला आणि दहशतवाद्यांचे प्रमुख अड्डे उद्ध्वस्त केले. कुख्यात दहशतवादी अजहर मसूद याच्या कुटुंबातील अनेकांना ठार केले. पाकला गंभीर चेतावणी दिली. पुलवामा येथील शहीद सैनिकांना श्रद्धांजली मिळाली. भारताचा विजयी पराक्रम पाहताना अभिमान आणि आनंद वाटतो. असो. सर्व कुलबांधवांना होळी व गुढीपाडव्याच्या शुभेच्छा.**

# सुविचार

''सर्वांनी मानव तेवढा एक असे मानणे हे ध्येय उत्तम आहे. ते मला प्रियही आहे. कोणीही आपल्या दाराला कुलूप घालू नये हा नियमही आदर्श आहे. पण जगात चोर आहेत हे जाणून ज्याप्रमाणे आपण 'कुलूप घालू नये' हा 'आदर्श' नियम दूर ठेवून आपआपल्या घराला कुलूप लावतो. त्याचप्रमाणे जगात इतर धर्मीय राष्ट्रीय लोक आहेत, तोपर्यंत मी सुद्धा हिंदू म्हणून जगणे आणि माझ्या राष्ट्राला हिंदुत्वाचे कुंपण घालणे आवश्यक आहे.''

**– स्वातंत्र्यवीर सावरकर**

# काकूने कर्तृत्ववान पुतण्याला लिहिलेले पत्र

• श्रीमती प्रतिभा सुधाकर मराठे (पृ. १२९), ठाणे दूरध्वनी : ०२२-२५४२०७७१



।। श्रीराम प्र. ।।

चि. सतीश सप्रेम आशीर्वाद

वि. प्रकृति सांभाळून काम करावे.

विशेष- तुझ्या यशाचे कौतुक

साधारण ८/१० दिवसापूर्वी मला सुधीरचा फोन आला आणि तो मला म्हणाला, ''मराठे प्रतिष्ठान डिसेंबरमध्ये एक मासिक काढते आहे. त्यासाठी सतिशचे कौतुक तू शब्दबद्ध करावेस असे मला वाटते. त्यामुळे आपल्या परिवाराला सतीशचे यश कळेल... वगैरे... वगैरे...

तुझ्या काकांचे माझ्याशी लग्न झालं १९५९ मध्ये. तुझा जन्म १९५० म्हणजे माझ्या लग्नात तू नऊ वर्षाचा होतास. लग्नानंतर साधारण वर्षभर आम्ही दादरला तुमच्या समवेत राहिलो आहे. त्या काळातला तो सहवास तसेच ठाणे-दादर असे आपण राहत असल्यामुळे बऱ्याचदा येणे-जाणे.

आमच्या लग्नाची जेवणे झाल्यानंतर दादा दादरला गेले. त्यावेळी ते रंगूनला नोकरीला होते. त्यावेळचा तुझा विचारमग्न चेहरा मला आजही आठवतो. एवढ्या लहान वयात हा मुलगा कसला विचार करत असेल! याचे मला कुतूहल वाटले आणि हा मुलगा कोणीतरी, काहीतरी वेगळा आहे, असे मला जाणवले. ते तुझे पहिले रूप!

त्यानंतर तुझे शिक्षण, बारावीपासून तू बँकेत करत असलेली नोकरी हे ही आठवतं. बी.कॉम. नंतर तू जनरल लॉ पदवी घेतलीस. पत्रकारितेमध्ये तू पदविका ही घेतलीस आणि भारतीय विद्याभवन या प्रतिष्ठीत संस्थेकडून तुला वार्तांकनाचे 'सुवर्ण पदक' मिळाले.

''सहकार भारती'' ही संस्था १९७९ मध्ये स्थापन झाली. त्या संस्थेच्या संस्थापक सदस्यापैकी तू एक आहेस. ६ वर्षे तू या संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषविलेस आणि आजही संरक्षक व मार्गदर्शक म्हणून काम करतोस.

बँक ऑफ इंडियामध्ये तू साधारण १८-१९ वर्षे नोकरी केलीस आणि आपल्या हुषारीने, सचोटीने तू डोंबिवली नागरी सहकारी बँकेचे सीईओ पद, जनकल्याण सहकारी बँकेचे सीईओ पद, युनायटेड वेस्टर्न बँकेचे अध्यक्षपद व मुख्य कार्यकारी अधिकारी अशी पदे प्राप्त केलीस. अभिनंदन! हा शब्दही अपुरा आहे.

अ.भा.वि. परिषदेचा तू विद्यार्थी जीवनापासूनच सक्रीय कार्यकर्ता आहेस. तेथेही आपल्या कर्तृत्वाने मुंबई शाखेचे सचिवपद. 'छात्रशक्ती' या इंग्रजी मासिकाचे संपादन व अ.भा. वि.प.चा अखिल भारतीय कोषाध्यक्ष ही जबाबदारी पार पाडलीस.

आणिबाणीच्या विरोधात आंदोलन केल्याबद्दल तुला मिसाखाली अटक झाली. साधारण ९।।/१०ची सकाळ होती. बाहेर पोलीस आले होते व तू अंघोळीला गेला होतास. अंघोळीनंतर कपडे करून जणू सहज बाहेर जातो आहेस अशा अविर्भावात तू निघून गेलास. वहिनी धो! धो!! रडल्या. साहजिकच होतं ते. मला मात्र काहीच सुचेनासं झालं. आईची समजूत देवालाही काढता येत नाही. तेथे मी त्यांची काय समजूत काढणार. पण काळ हा जालीम ऊपाय असतो.

तुला १९ महिन्याची अटक झाली आणि रवानगी नाशिक तुरुंगात साधारण दोन तीन महिन्यानंतर आप्पा आणि मी तुला भेटायला आलो होतो. भेट अवघ्या १०-१२ मिनिटांची! पण तेवढ्या अवधीत मला एका क्रांतिकारकाचे दर्शन घडले. तुझा लखलखीत गोरा रंग, पांढरा शुभ्र पायजमा, पांढराशुभ्र कुडता आणि चेहऱ्यावर देशप्रेमाचा जाज्वल्य अभिमान. तुझ्यातला देशभक्त मी कधीच विसरणार नाही.

पुढे पोलिसांच्या समवेत तू जयाच्या लग्नाला आला होतास लग्न जयाचे- पण उत्सवमूर्ती तूच होतास. तू भेटल्याचा आनंद आला संगळ्यांनाच.

मग सुटून आल्यावर पुन्हा नोकरी, तुझं लग्न, मुग्धाचा जन्म, आईचं आजारपण. तेव्हा तू करत असलेली कसरत. भारतीची त्रेधा हे सगळं मी जवळून पाहिलंय. आई टाटामध्ये असताना आठ दिवस मीच होते राहायला. त्यावेळी तुलाच पोचवावं लागायचं पण तुझी रजा वाचली एवढाच मला आनंद आणि सौ. वहिनींचा सहवास!

नंतर वहिनींचा मृत्यू. जीवनात आलेली पोकळी. जी काळच भरून काढतो. त्यानंतर ती. दादांचं आजारपण. त्यावेळची वेगळीच चिंता. त्यांना घरी एकट्याला ठेवणं अवघड झालं. पण ते सारं तुम्ही दोघांनी चांगल्याप्रकारे, धीटपणाने निभावलंत.

सहकार भारती, संघ, अ.भा.वि.प., बँकेचे क्षेत्र यामुळे तुझा वाढलेला प्रचंड गोतावळा मुग्धाच्या व पुष्करच्या लग्नाच्या स्वागत

समारंभात मलाच काय, सगळ्यांनाच दिसून आला. वधुवरांना भेटण्यासाठी लोकांच्या लागलेल्या लांबच लांब रांगा– ही तुझ्या जनसंपर्काची निशाणी!

IFFCO याकडून तुला सहकारिता रत्न पुरस्कार मिळाला. त्यानिमित्त सौ. जयाने एक घरगुती कार्यक्रम आयोजित केला होता. तेव्हा तुला मी पुष्पगुच्छ दिला होता. त्यावेळी तू म्हणाला होतास, ''काकू, तुला तर सारंच माहित आहे.'' त्यावेळी मला काय वाटलं हे मी नाही सांगू शकले. पण मन भरून आलं छाती अभिमानाने फुलली. आणि सौ. वहिनींची प्रकर्षानं आठवण झाली एवढं मात्र खरं!

मला आठवतं. साधारण २००८–९ साल असावं तू ठाण्याला आला होतास. त्यावेळी आम्ही 'पूनमछाया' मध्ये राहत होतो. चहापाणी झाल्यावर गप्पा मारता मारता तू म्हणालास, ''काकू, तुझ्याकडे किती पैसे आहेत? त्यावर मी म्हणाले, ''का रे बाबा, माझ्या पैशाची का चौकशी करतो आहेस?'' त्यावर तुझं उत्तर. ते मला फार भावलं. तू म्हणालास, अग, आपला एक कार्यकर्ता आहे. त्याची मुलगी मेडिकलला आहे. त्याची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. काही मदत दिलीस तर बरं होईल. सुदैवाने माझ्याजवळ ५००० रु. होते. ते मी तुला दिले. त्यावर तू म्हणालास, ''आता! लगेच!'' होय आहेत तर घे. उद्या माझी बुद्धी फिरली तर!''

त्या आधी तू त्याला मदत केली होतीसच. पण माझ्याकडून ही मदत तू घेतलीस. एका शिक्षणार्थीला मी अल्पशी मदत केली याचं तर मला समाधान मिळालंच. पण लोकांसाठी विशेषतः शिक्षणासाठी मदत करण्याची तुझी वृत्ती मला फार आवडली.

आप्पा नेहमी म्हणायचे, आजारपण, शिक्षण, घर उभं करण्यासाठी आपल्याकडून होईल तेवढी मदत जरूर करावी. नुसतं म्हणायचे नाहीत तर ते अशी मदत करायचे ही.

आणि आता उगवलं २०१८ साल

नुकतीच तुझी भारती रिझर्व बँकेच्या बोर्डावर 'डायरेक्टर' म्हणून तुझी नियुक्ती झाली. त्यानंतर रिझर्व बँकेच्याच B.F.S या अत्यंत महत्त्वाच्या मंडळावर 'संचालक' म्हणून तुझी नियुक्ती झाली. ही केवढी गौरवास्पद, आनंददायक गोष्ट आहे. येथे शब्दच अबोल होतात. अपुरे वाटतात!

या सर्व प्रचंड व्यापातून तुझी सामाजिक कामाची नाळ अजूनही तुटली नाही. मुंबईपासून १०० कि.मी. अंतरावरील जव्हार या वनवासी भागात 'प्रगती प्रतिष्ठान' या संस्थेचा मानद अध्यक्ष म्हणून तू कार्य करत आहेस. या सामाजिक भानाला आम्हा सर्वांचाच सलाम!

तुझ्या कार्यात तुझ्या धडपडीत तुझ्या यशात सौ. भारतीचा मोठा वाटा आहे. तू सतीश म्हणजे सतीचा ईश आहेस पण भारती तुझी शक्ती आहे. शक्तीशिवाय माणूस काहीच करू शकत नाही. एका तत्त्वनिष्ठ, यशस्वी पुतण्याची मी काकू आहे. याचा मला खूप अभिमान आहे.

तुला असेच उदंड यश मिळो व भारतीची तुला अखंड साथ मिळो अशी ईशचरणी प्रार्थना!

तुझे पुनश्च भरभरून कौतुक.

तुझी काकू

श्रीमती प्रतिभा सुधाकर मराठे, ठाणे
०२२–२५४२०७७१

## आरोग्यं धन संपदा



तोंड येण्याचा त्रास होऊ नये यासाठी पुढील गोष्टींची काळजी घ्या.

१) कायम पोषक आहार घ्या.
२) 'ब' जीवनसत्त्वाच्या गोळ्या ५ ते ७ दिवस घ्या.
३) आहारात दह्याचा समावेश करा.
४) तुरटीच्या पाण्याने चूळ भरा.
५) कोमट पाणी पीत राहा.
६) मुखदुर्गंधीचा त्रास जाणवत असेल तर तो रोखा. तुळशीची पानं चावून खा. दंतवैद्याचा सल्ला घ्या.
७) कडक, तिखट, आंबट, खारट पदार्थांचा सेवन कटाक्षानं टाळा.

## हसरे हितगुज

### काय करणार?

बापू मित्राकडे गेला. दारातूनच त्यानं विचारलं,
''वाहिनी, सदू कुठाय?''
''त्यांचा पाय मोडलाय. दवाखान्यात आहेत.''
सदूच्या बायकोनं सांगितलं.
''आँ! काय झालं?'' – बापू
''अहो, परवा शेवग्याच्या शेंगा काढा म्हटलं. आमटीला झाल्या असत्या. पण ते झाडावर चढले आणि फांदी मोडली.
ते सरळ खाली दणकले.''
''मग?''
''मग काय? मी उसळच केली त्या दिवशी.''
वहिनीनी खुलासा केला.

# तिशीचा उद्योजक - कूल क्रॉप टेक्नोलॉजीज प्रायवेट लिमिटेडचे सीईओ नीरज हेमंत मराठे

• श्री. सदाशिव बळवंत मराठे (पृ. ३८०), बडोदे दूरध्वनी : ०२६५-२४२३०५५

**सा**मन्यात: तरुणांचे, शैक्षणिक पदवी मिळाल्यावर मुख्य लक्ष्य पैसे कमविण्याचे असते. खूप कमी तरुणांना वाटते की आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करून आर्थिक उपार्जनाचे साधन ठरवावे व त्यातूनच आनंद मिळवावा. अशा कामात मेहनत प्रचंड असते व वेळेचेही भान राहात नाही. व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यास एक सुवाक्य कुठेतरी वाचल्याचे स्मरते ते म्हणजे आपल्या आवडीचे क्षेत्र निवडावे परंतु ते शक्य नाहीच झाले तर मिळेल त्या क्षेत्रात - कामात आवड निर्माण करावी''

वरील परिच्छेदात केलेल्या वाक्याचा उपयोग करण्याचे कारण - तिशीच्या एका डबल ग्रेज्युएट तरुणाने आपल्या जीवनातील आवडीचा मार्ग पत्करून घेतलेल्या धाडसी निर्णयाचे समर्थन करून पसंत केलेल्या क्षेत्रात खूपच अल्प काळात घवघवीत यश कमावून दाखविले व सरकार दरबारी ही त्याची नोंद घेणे आवश्यक झाले हे सर्वांपर्यंत पोहोचविण्याची इच्छा.

नीरज हेमंत मराठे ह्याची ही यशोगाथा आहे. २००९ साली बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विश्व विद्यालयाच्या तंत्रज्ञान शैक्षणिक क्षेत्रात 'मेकेनिकल इंजिनीयर'ची पदवी घेतली. त्यात मशीन डिझाईन, प्रॉडक्ट डेव्हलपमेंट, क्वालिटी कंट्रोल आणि आल्टरनेटीव्ह एनर्जी सोर्सचा विशेष अभ्यास केला. त्यानंतर लार्सन अँड टूब्रो हेवी इंजिनियरिंग लिमिटेड, सुरत येथे हेवी इंजिनियरिंग डिव्हिजनमध्ये २००९ ते २०११ पर्यंत नोकरीचा अनुभव घेत असताना स्वत:चे कर्तृत्व दाखविण्याची संधी न मिळाल्याने मानसिक असमाधान वाटत होते. कारण त्याच्याकडून कंपनीने ठेवलेल्या अपेक्षा त्याला न पटणाऱ्या होत्या.

अशा परिस्थितीत झगडत असतानाच त्याचे यशाचे द्वार खटखटले - २०१२-२०१३ एक वर्षासाठी जर्मनीत Research Assistant at Faculty of Assemble Technology of Factory Management, Technical University of Berlin, Germany येथे अभ्यास करण्याची संधी मिळाली व तेथे पदवी मिळवली. त्याच काळात बर्लिन मध्ये अखिल जर्मनी विद्यार्थी स्पर्धेत २०१२चे ''Student of the Year''चे दुसऱ्या नंबरचे पारितोषिक व ट्रॉफी त्याने पटकाविली.

जून २०१३ ते डिसेंबर २०१३ Deutsche Gesellschaft fur Internationale Zusammernarbeit (GIZ) या संस्थेत intern म्हणून असताना भारतातील कृषी क्षेत्रात ''decentralized PV-powered cold storage''चा उपयोग करण्याची शक्यता यावर अभ्यास केला. यात सद्य परिस्थितीतील तंत्रज्ञान, सध्याचा कृषी उत्पादकांच्या पुरवठ्याची पद्धत, त्यासाठीचे कायदे व सोयी, छोट्या शेतकऱ्यांना वापरता येईल असे कोल्ड स्टोरेजचे मोडेल्स या संदर्भात नीरज ने आपले विचार विस्तृतपणे मांडले. हा अभ्यास पश्चिम बंगालच्या ONergy या GIZ च्या पार्टनरच्या सोबत केला.



सप्टेंबर २०१४ ते मे २०१६ ह्या काळात GIZच्या बंगलोर येथील SELCO Foundationच्या ''mini-grids and PV grid-tie system''च्या पायलट प्रोजेक्ट मध्ये मुख्य भूमिका (लीड रोल) बजावली. यात तंत्रज्ञान विशेषज्ञ, पोलिसी मेकर्स, कायदे व्यवस्था प्रणाली, प्रॅक्टिस करणारे यांच्यात सुसंवाद साधून या हे प्रॉडक्ट अस्तित्वात कसे आणता येईल यावर विशेष भर होता.

वरील शिक्षण व अनुभव प्राप्त करून जून २०१६ पासून बडोद्यात Cool Crop Technologies Private Limited नावाची कंपनी, Mr John Kendall Nowocin, व Mr George Chen या दोन अमेरिकन डॉक्टरेट डायरेक्टर सह को-फाउंडर म्हणून सुरू केली. ही कंपनी गुजरात सरकार कडून रजिस्टर केली गेली आहे व नीरज या कंपनीचा CEO म्हणून कार्यभार सांभाळत आहे.

यानंतर १५-०८-२०१७ रोजी दुबई येथील EXPO २०२०च्या उद्योजकांच्या मेळाव्यात कंपनी तर्फे पेपर सादर केला. तेथे संपूर्ण जगातून ४००० पेपर्स सादर केले गेले होते, त्यातून ३० निवडले व त्याचे परिणाम ऑक्टोबर २०१७ ला जाहीर झाले, ज्यात CoolCrop निवडून आले व त्यास एक लाख डॉलरचे पारितोषिक मिळाले.

तदनंतर राजस्थान सरकार कडून ''Challenge for Change'' या उपक्रमात पंचवीस लाख रुपयांची Work Order मिळाली. त्यांनतर केंद्र सरकारच्या Start-up India Development Scheme Plan मध्ये पण Agriculture Grand Challenge

programme साठी इंटरव्यू दिला. त्यात २००० स्पर्धकांमधून १२ निवडले गेले ज्यात नीरज मराठे एक होता. भारत सरकारच्या कृषी मंत्रालयातर्फेही त्याची निवड झाली, अर्थात केंद्र सरकारच्या योजनांमध्येही काम करण्याची त्याला संधी मिळाली.

नीरजला कंपनीच्या कार्याबद्दल विचारले असता, तो म्हणाला, ''आमचे लक्ष विशेषकरून शेतकरी व मासेमारी करणाऱ्या गरीब लोकांना त्यांच्या उत्पादन व मालाचा संग्रह करण्यासाठी, कमीत कमी खर्चात सौर ऊर्जा वर चालणारे कोल्ड स्टोरेज उपलब्ध करून देऊन, त्यांचा अधिकाधिक फायदा करून देणे व त्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारावे याकडेच असते.''

सध्या त्याचे कार्य देशातल्या ओडीसा, बिहार, कर्नाटक, गुजरात यासारख्या निरनिराळ्या प्रांतातून सुरू आहेच तसेच त्याचे काम पाहून इतर दोन कंपन्यांनी त्याच्या कंपनीला पाठींबा दिला आहे.

ह्या तिशीच्या अदम्य उत्साही, मेहेनती तरुणाचे कौतुक व अभिनंदन.

त्याच्या उज्ज्वल यशप्राप्ती साठी खूप शुभेच्छा.

१. डायरेक्टर व CEO : नीरज मराठे, २. डायरेक्टर : जॉर्ज चेन, ३. डायरेक्टर : जॉन केंडल नोवोसिन

कंपनीचा पत्ता :

CoolCrop Technologies Private Limited,
"Annapurna", Shastry Pole, Near Kothi Char Rasta,
Raopura, Vadodara-390001 (Gujarat) (India)
Mob : +91 9972767937

◆

# स्त्रीची शृंगारलक्षणे

**रा**जा भर्तृहरीने मानवी जीवनातील आदर्श अशी नीती आपल्या 'नीती शतक' या काव्यात सुयोग्य रितीने सांगितली आहे. जीवनाच्या अखेरीस राजा भर्तृहरीच्या विचारांत मूर्तिमंत वैराग्य साकारले. वैराग्याचे यथायोग्य वर्णनही त्याने आपल्या 'वैराग्यशतक' या काव्यात केले आहे. मानवी जीवनांत नीतीमत्ता आणि वैराग्यविचार या गोष्टी जितक्या सत्य आणि आवश्यक असतात, तितक्याच प्रमाणांत जीवनाच्या यौवनात 'शृंगार' हा विषयही सत्य आणि आवश्यक असतो!

वैराग्य आणि अखेरीस मृत्यू ही अवस्था जितकी निश्चित तितकीच यौवनातील शृंगारावस्थाही अपरिहार्य आणि अटळ असते.

ज्याच्या जीवनात कधी शृंगार फुललाच नाही त्याच्या जीवनात वैराग्य वांझोटेच म्हणावे लागेल.

अर्थात या वास्तविकतेला कोटी कोटी माणसांतून एखादाच सत्पुरुष अपवाद ठरू शकतो, हेही तितकेच खरे आहे.

...जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करणाऱ्या भर्तृहरीच्या अनुभवजन्य शृंगार-प्रतिमेचा आविष्कार प्रतिभासागरांतील एक ओंजळ वाचकांना सादर करीत आहे.

यौवनाच्या वसंतुऋतूत फुललेल्या स्त्रिया या सर्वांगानी आभूषणांसारख्या विलोभनीय वाटतात.

राजा भर्तृहरी म्हणतो :- युवतीचे मुख हे निसर्गतःच प्रफुल्लीत आणि आनंददायक वाटते. त्यांचे नयन म्हणजे डोळे कमलपुष्पांच्या मोहकतेलाही मागे टाकतात. त्यांची सतेज अंगकांती सोन्याहूनही अधिक सरस वाटते. भुंग्यांचा रंग जसा काळाभोर तरीही त्याच्या तकतकीतपणामुळे विलोभनीय वाटतो, त्या रंगाची अपूर्व शोभा फिकी पडावी असा युवतीचा काळाभोर केशसंभार तिच्या सौदर्याची शोभा शतपटीने वाढविणारा दिसतो. युवतीच्या स्तनसंभाराविषयी वाचकाला नव्याने सांगण्यासारखे काही नाही. परंतु (भर्तृहरीला वाटते) अशा सौंदर्यवती युवतीचे स्तन मदोन्मत हत्तीच्या गंडस्थळाला लाजवणारे असतात! ...अशा सौदर्यवतीच्या नितंबांमुळे दर्शनीय तसेच वांछनीय सुख किती मौलिक असणार, हे निराळे सांगावयास नको.

...परंतु ही झाली सगळी शरीरलक्षणें. राजा भर्तृहरी शरीराच्या शारीरिक सौंदर्याला साजेसे महत्त्व देतो, परंतु त्याच्या मते अशा स्त्रियांच्या भावुक मनोवृत्तीतून, कोमल स्वभावामुळे मुलायम आवाजातील संभाषण हे सर्वाधिक प्रभावशाली आनंददायक आणि परिपूर्ण आरोग्याचा ठेवाच ठरते. ...राजा भर्तृहरीने वर वर्णन केलेली स्त्रियांची भूषणें ही त्याच वेळी, पुरुषांना कामविव्हल करणारी शस्त्रेच ठरतात.!

**संकलन : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे** (पृ. १२०)




## हसरे हितगुज

बायको : अहो, उठा, मी पोळ्या करायला घेतेय.
नवरा : मग, मी काय तव्यावर झोपलोय का?

– (स्थळ : अर्थातच पुणे)

# सुटाबुटातला चोर

• गोविंद नारायण मराठे (पृ. ५४१), गोवा भ्रमणध्वनी : ९७६५०४२५६६

गेल्या गणेशचतुर्थी पूर्वीचे दोन दिवस मी पुण्याला मुलाकडे रहाण्यासाठी गेलो होतो. सोबत पत्नी गीता होती. माझी गजानन महाराज शेगांव यांच्यावर नितांत श्रद्धा आहे. कैकवेळा 'गजानन विजय ग्रंथा'चे पारायणही केले आहे. गीताही दररोज ग्रंथाचे वाचन करत असते. नेहमी मनात यायचं महाराजांच्या समाधीचे दर्शन घ्यायचे. कारण गोव्यातून शेगाव चोवीस तास, पुण्याहून बारा तास. मुलगा अमित हाही श्रद्धाळू व भाविक आहे. त्याने सपत्नीक यापूर्वी दर्शन घेतले आहे. त्याला वाटले, वृद्ध माता व पित्याला दर्शन घडवावे. आमचा तो श्रावणबाळच म्हणाना.

चतुर्थीपूर्वी रेल्वेचे रिझर्व्हेशन करावे म्हणून त्याने प्रयत्न केले. रेल्वे हाऊस फुल्ल. जाण्याचा तर निश्चय होताच. गजानन महाराजांना भक्ताला आणायचे असावे. आमच्या सुदैवाने वातानुकूलीतचे रात्रीचे साडेसातचे रिझर्व्हेशन मिळाले. पुण्याचे उपनगर बावधन येथून जाण्यासाठी हायवेवर थांबलो. पाऊस जोराचा पडत होता. सगळीकडे सामसूम. अखेर आमची बस आली. साडेसातची बस, पण ती सुटली आठ वाजता. सगळे विचित्र वाटत होते. पोटात कावळे कावऽऽ कावऽऽऽ करत होते. बस ठराविक ठिकाणी थांबणार होती. बस पूर्णपणे भरली होती. दहा पंधरा किलोमीटर बस पोहोचताच ड्रायव्हर व कंडक्टरने सूचना केली. बस अर्धातास थांबेल तोपर्यंत चहापाणी, जेवण वगैरे कार्यक्रम उरकून घ्या. सर्वांना बरे वाटले. एकेक करून सर्वजण खाली उतरले. ओघाओघाने आम्ही तिथे उतरलो. सोबत आणलेली पोळी आणि भाजी खाल्ली. पावसाळ्याचे दिवस असल्याने चहा-पान केले. प्रथम आम्ही बसमध्ये आलो. त्यानंतर एकेक आत आले. त्यावेळी एक विलक्षण घटना घडली. ती कधीही विसरू शकत नाही. आपल्या वाचकांच्या प्रवासात अशा घटना केव्हा ना केव्हा घडल्याच असतील.

बस सुटण्यापूर्वी एक पंचवीस तीशीतला मुलगा आरामात बसमध्ये आला. त्याने पाहिले तो जिंकला. आम्ही दोघे अगोदरच बसलो होतो. त्यानेही आपण एक प्रवासी चहापान करून येथेच उतरत आहे. असा आभास निर्माण करून कोणा एका विद्यार्थ्याची पाठीला अडकवयाची बॅग पाठीला अडकवून इकडे-तिकडे आरामात लक्ष देऊन निघून गेला. त्याला आम्ही पाहिले, ज्याची बॅग होती, त्यालाही सांगितले. तो निघून गेला. आम्हाला काय माहीत तो 'सुटाबुटातील चोर' होता म्हणून? झाले! त्या प्रवाशाने सर्वांच्या बॅगा तपासल्या, त्याच्या बॅगेत अमूल्य कागदपत्रे, पैसे होते. सारे हतबल झाले. शेवटी पोलिसांना पाचारण करण्यात आले. नियमाप्रमाणे झाडाझडती झाली. त्यात पुरते दोन तास गेले. अशी घटना वैऱ्यालाही न येवो. अखेर बस सुटली. त्या बॅगेचे काय झाले असेल?

सकाळी सहाच्या ठोक्याला शेगाव नगरीला पोहोचलो. खोली आरक्षित केली. नित्यकर्म उरकले व महाराजांच्या दर्शनासाठी रांगेत राहिलो. तो काय... रांगेशिवाय घोळके जात होते. त्यातून आरामात समाधी दर्शन घेतले. महाराजांना साकडे घातले. अशीच तुझी वारी होऊं दे व कटू प्रसंग येऊ नये. सहज दुर्मिळ दर्शन मिळणे ही प्रवासातील आनंददायी आठवण व प्रवासातील हा चोरीचा कटू अनुभव.

## सुगरणीचा सल्ला

- आंब्याचा रस किंवा श्रीखंड आंबट असल्यास त्यात थोडा खाण्याचा सोडा दुधात विरघळून घालावा. सर्व आंबटपणा निघून जातो. आंबट पदार्थात खूप साखर घातल्यास चव वेगळी लागते.
- गुलाबजाम हमखास चांगले होण्याकरता खवा मळताना त्यात अर्धी वाटी पनीर मिसळा. पनीरमुळे पाक आतपर्यंत शिरतो आणि गुलाबजाम हलके होतात.



- मेदूवडे करताना वड्याचं पीठ पातळ झाल्यास त्यात बारीक रवा मिसळावा. वडे कुरकुरीत होतात.
- काही भाज्या चिरल्यानंतर हाताला काळे डाग पडतात आणि ते लवकर जात नाहीत. भाजी चिरण्यापूर्वी हाताला व्हिनेगर चोळा, काम झाल्यावर कोमट पाण्यानं हात धुवनू टाका.

# डोळस जबाबदारी

• आदिती अतुल मराठे (पृ. ५१३), पुणे　　　　भ्रमणध्वनी : ९४२२३१५३८५

अद्वैतचं याच वर्षी एम.ए. (ललित कला) पूर्ण झालंय. त्याला त्या आणि गाण्याच्या क्षेत्रात करियर करायचं. तो स्वतःचे स्वतंत्र गाण्याचे कार्यक्रमही करतो. मुख्य म्हणजे संपूर्ण पुण्यात तो एकट्याने फिरतो. अंधपणाचा बाऊ न करता 'डोळस'पणे जगतोय. अर्थात त्याच्यातील समजूतदारपणा, हळवेपणा, सामाजिक जाण यायला आम्हा सगळ्यांचीच कसोटी लागली होती.

अद्वैत झाला तेव्हा मला नुकताच सातवा महिना लागला होता. तो अपुऱ्या दिवसांचा असल्याने दोन महिने इन्क्युबेटरमध्येच होता. दोन महिने पूर्ण झाल्यावर आम्ही घरी परतलो. तो ४-५ महिन्यांचा झाल्यावर त्याच्या डोळ्यात काही दोष असावा, अशी शंका यायला लागली. कारण त्याचा एक डोळा लहान एक मोठा जाणवत होता. डॉक्टरांकडे घेऊन गेल्यावर त्याला दिसू शकणार नाही याचा अंदाज आला. डॉक्टरांनी सांगितलं की, तो इन्क्युबेटरमध्ये असताना जास्तीचा ऑक्सिजन दिल्यामुळे तसंच तो अपुऱ्या दिवसांचा असल्याने त्याला 'रेटिनोपॅथी ऑफ प्रिमॅच्युरिटी' हा आजार होऊन अंधत्व आले होते. सगळ्यात मोठा धक्का होता तो म्हणजे त्याच्या आजारावर, अंधत्वावर कोणतेही उपाय नव्हते, किंबहुना आताही नाहीत. त्यामुळे तो कायमस्वरूपी अंधच राहाणार होता. हे कळल्यावर आईचं मन ही गोष्ट सहजासहजी मान्य करायला तयार होत नाही. त्यामुळे त्या वेळी अगदी देशभरातील नेत्रतज्ज्ञांना आणि परदेशातील नेत्रतज्ज्ञांशी पत्रव्यवहाराद्वारे संपर्क साधला. अद्वैत चार-साडेचार वर्षांचा होईतो आम्ही हे प्रयत्न केले; पण कुठेच काही आशेचा किरण दिसत नव्हता. सगळ्याच तज्ज्ञांनी कोणतेही उपाय नसल्याचेच सांगितल्यावर मग मात्र सातत्याने डॉक्टरांना दिल्या जाणाऱ्या भेटी थांबवल्या. अद्वैतच्या अंधपणामुळे मीच नव्हे तर त्याचे बाबा आणि आजी-आजोबाही कोलमडले होते. आपलं मूल फक्त पाहूच शकत नाही, अन्यथा तो सामान्य आहे तेव्हा आता आपल्यालाच उभं राहणं गरजेचं आहे हे मी स्वतःला बजावलं आणि त्या धक्क्यातून, दुःखातून बाहेर काढलं.

अद्वैतला आम्ही कोरेगाव पार्क अंध विद्यालयात घातलं. तिथे तो चौथीपर्यंत शिकला. त्याचं शिक्षण सुरळीत पार पडण्याला कारण मात्र त्याचे बाबा आहेत. त्यांनी न थकता त्याला शाळेत, पुढे महाविद्यालयात नेणे-आणणे केल्याने ते निर्विघ्नपणे पार पडले. अद्वैतचे बाबा म्हणजे अतुल मराठे यांचा व्यवसाय असल्याने त्यांनी अद्वैतच्या वेळापत्रकाप्रमाणे आपलं वेळापत्रक बनवलं होतं. माझ्या सासूबाई म्हणजे अद्वैतच्या आजी शिक्षिका होत्या, त्या अद्वैतला शिकवत असत. त्याचा अभ्यास घेता यावा यासाठी आम्ही दोघीही ब्रेल लिपी शिकलोय. त्याचा अभ्यास त्याच्या आजीने आणि मी अगदी महाविद्यालयापर्यंत घेतला. सहकार्य केले. आम्ही त्याला ब्रेलमधून तर शिकवायचोच शिवाय कॅसेटमध्ये त्याला समजेल अशा पद्धतीने अभ्यास रेकॉर्ड करून ठेवायचो. मग तो ते ऐकून समजून घ्यायचा. हीच पद्धत अगदी त्याचे एम.ए. पूर्ण होईपर्यंत वापरली.



तो लहान असताना एकदा अद्वैतला पोपटाची माहिती लिहायला सांगितली होती. हे त्यांच्या सारख्या मुलांसाठी आव्हानच होते, कारण फूल, पान, भाज्या अशा गोष्टी रंग, आकार यावरून ओळखायला शिकवता येतात, मात्र पक्षी किंवा जे प्राणी सहज उपलब्ध होत नाहीत त्याचे वर्णन कसे सांगणार? मग आम्ही येथील तुळशीबागेत जाऊन प्लॅस्टिकचा पोपट आणला आणि त्यावरून त्याची चोच त्याचा आकार वगैरेची माहिती दिली. अशाच प्रकारे अनेक पक्षी, प्राणी ओळखायला शिकवले. अद्वैतच्या आजीने त्याला चौथीत असताना स्कॉलरशिपच्या परीक्षेलाही बसवले होते. एवढेच नव्हे तर त्यांनी शाळेला विनंती करून चौथीच्या सगळ्याच मुलांना स्कॉलरशिपला बसवले, त्यांची फीसुद्धा भरली आणि त्यांना मार्गदर्शनही केले. शाळेचा स्कॉलरशिपचा निकाल १०० टक्के लागला. स्कॉलपशिपला बसणारी ही त्यांची पहिली आणि शेवटचीच बॅच ठरली, त्यानंतर असे प्रयत्न झाले नाहीत. चौथीनंतर मात्र पुण्यातल्या कुठल्याच सामान्य शाळेत त्याला प्रवेश मिळाला नाही. त्या वेळचा अनुभव फारच त्रासदायक होता. अखेर पाचवी ते सातवी तो मुंबईतल्या ताडदेव इथल्या 'व्हिक्टोरिया मेमोरिअल स्कूल' या शाळेत शिकला. आठवीला त्याला पुण्याच्या 'ज्ञानप्रबोधिनी' या शाळेत

प्रवेश मिळाला. त्या शाळेमध्ये त्याला लेखनिकही मिळाला, त्यामुळे दहावीचे त्याचे शिक्षण उत्तमरित्या पार पडले. माझी खरी कसोटी लागली होती ती अद्वैतला समजावताना. त्याला मी म्हटलं होतं की, ''तुला फक्त डोळेच नाहीत, पण असे अनेक जण आहेत, की त्यांना अनेक गोष्टी (अवयव) नसतात. कित्येकांना हात-पाय नसतात, ज्यांना हात-पाय आहेत त्यांना ऐकायला येत नाही, बोलायला येत नाही, मग तू हे जग आमच्या डोळ्यांनी बघ.'' आणि अद्वैतने सगळं समजूतदारपणे स्वीकारलं. त्याच्या आजी-आजोबांनी त्याला श्लोक, गीतेचे अध्याय शिकवले. तो शाळेतही चांगलाच रमला. कॉलेजला गेल्यावर तो त्याच्या गॅजेट्समध्ये लेक्चर रेकॉर्ड करून आणायचा आणि त्याच्यावरून अभ्यास करायचा. त्याला मोबाइल, अत्याधुनिक गॅजेट्स अगदी सहजपणे हाताळता येतात.

सगळ्यांच्या सहकार्यामुळे असेल तो घराबाहेर पडायला कधी बुजला नाही. नातेवाईकांचाही सकारात्मक पाठिंबा मिळाल्याने असेल लोकांमध्ये वावरण्याचा आत्मविश्वास त्याला आला. अद्वैतच्या प्रवासात त्याला अगदी काही अपवाद वगळता वाईट अनुभव फारसे आले नाहीत. त्याने पुणे विद्यापीठात बी.ए.साठी प्रवेश घेतल्यानंतर त्याच वर्षी त्याच्या प्राध्यापक मॅडमनी मला बोलावून घेतलं आणि तुमचा मुलगा 'स्लो लर्नर' आहे, असे सांगून दुसरीकडे प्रवेश घेण्याचा सल्ला दिला होता. अर्थात 'इतक्या वर्षांत हे सांगणाऱ्या तुम्ही पहिल्याच आहात आणि शेवटच्याही असाल', असं मी ठणकावून आले होते. मात्र या प्रकारामुळे अद्वैत फारच अस्वस्थ झाला होता. त्यातून त्याला सावरत अधिक चांगल्या प्रकारे अभ्यास करण्यासाठी त्याला प्रवृत्त केले आणि आज तो उत्तम गुणांनी एम.ए. झालाय. अर्थात त्या प्राध्यापिकेनेही सुरुवातीला अद्वैतला समजण्यात चूक झाली हे मान्य केले. एम.ए. करताना त्याच्या मित्रमैत्रिणींनी त्याला खूप सहकार्य केलं.

अद्वैतला आम्ही शाळेत असतानाच अलूरकर म्युझिक क्लासेसमध्ये गाणं शिकायला पाठवलं होतं. त्याला गाण्याची आवड आहे हे लक्षात घेऊन मग त्याची गाण्याची शिकवणी कायम सुरू ठेवली. तो जानेवारी महिन्यात गांधर्व विद्यालयातून संगीतविशारद ही पदवी पूर्ण करेल. याच महाविद्यालयातून तो पद्माकर थत्ते यांच्याकडे गाणं शिकला. तसंच तो उस्ताद अन्वर कुरेशी यांच्याकडे गझल शिकतो. श्रीधर फडके यांचेही त्याला मार्गदर्शन मिळत आहे. त्याला कतरिना कैफबरोबर एका जाहिरातीत झळकण्याचीही संधी मिळाली आहे. स्वागत थोरात त्यांच्या 'अपूर्ण मेघदूत' या नाटकातही तो काम करतो. त्यांच्या प्रशिक्षणामुळे अद्वैत अधिकच मोकळा झाला.

अद्वैतशी माझा सतत संवाद सुरू असतो. रोज रात्री आम्ही काही काळ वेळ संगीत ऐकण्यात घालवतो आणि त्या वेळी दिवसभरातल्या घडामोडींवर चर्चाही करतो. तो अतिशय संवेदनशील आहे. आम्ही कोणी आजारी असलो तर औषधं वेळेवर घेतोय ना, याची चौकशी करेल, एवढेच नव्हे तर आमच्या नातेवाईकांनाही नियमित फोन करून त्यांची विचारपूस करेल. असा हा अद्वैत!


विशेष मूल असलं तरी मुलांवर आपण १०० टक्के विश्वास ठेवला पाहिजे. या मुलांचं पालकत्व ही संपूर्ण घराची जबाबदारी. त्यांच्या पाठीशी आपणच खंबीरपणे उभे राहायला पाहिजे. आज जगात त्यांना 'डोळस'पणे वावरता यावं यासाठी बऱ्या-वाईटाची शिकवण दिली पाहिजे. मग या मुलांनी त्यांचं त्यांचं आकाश कवेत घेतलं नाही तरच नवल!

adeetee1968@gmail.com/chaturang@expressindia.com
शब्दांकन : रेश्मा भुजबळ

## सहवेदना

कै. श्रीमती शालिनी जगनाथ मराठे (पृ.१२०) यांचे दि. १ फेब्रुवारी २०१९ ला वार्धक्यामुळे दुःखद निधन झाले. त्या ९१ वर्षांच्या होत्या. 'पुण्याच्या काकू' म्हणूनच आम्ही त्यांना ओळखायचे. प्रसन्न, सदा हसतमुख, बोलक्या, लाघवी, कामसू, आलेल्या पाहुण्यांचा आदर सत्कार करणाऱ्या, सुगरण रसिक, भरपूर प्रवास केलेल्या, गाडी उत्तम ड्रायव्हिंग करणाऱ्या, पुण्याची सगळी खडान्‌खड इत्यंभूत माहिती असणाऱ्या, दिसायला सुंदर, धनाने आणि मनाने श्रीमंत असणाऱ्या अशा या पुण्याच्या काकूंचे आमच्यातून निघून जाणे हे मनाला चटका लावणारे आहे.

मराठे प्रतिष्ठान हा त्यांचा जिव्हाळा होता. नीलांबरीताईंवर त्यांचा विशेष लोभ होता. वधू-वर स्थळं, विवाह जमवून देणं हे काम त्या सेवा म्हणून करायच्या. मराठे प्रतिष्ठानच्या संमेलनांना, कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित राहायच्या. यथाशक्ती देणगी द्यायच्या. 'हितगुज'ची वाट पाहात असायच्या. वाचून झाल्यावर अभिप्राय द्यायच्या. श्रीमती शालिनी जगनाथ मराठे यांना मराठे प्रतिष्ठानद्वारा भावपूर्ण श्रद्धांजली.



श्रीमती मालतीबाई गोविंद मराठे रा. सांगली, वय १०२ वर्षे, यांचे दि. २५ मार्च २०१८, रामनवमी, या दिवशी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, ४ मुली, नातवंडे व पणतंलडे असा परिवार आहे. श्री. म.गो. मराठे हे त्यांचे पुत्र आहेत.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्रीमती मालतीबाई यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# वाचकांचा पत्रव्यवहार

**मा. सौ. सुमेधा मराठे**
संपादिका हितगुज मुंबई ४०० ०३१
स.न.वि.वि.

नेहमी ज्या अंकाची वाट बघतो तो सप्टेंबर १८ चा ‘हितगुज’चा अंक दि. १४ रोजी मिळाला. गेल्या वेळचा अंक १ तारखेस मिळाला होता. या अंकातील माझी कथा वाचून सौ. साधना मराठे यांनी फोन वरून कथा आवडल्याचे सांगितले होते व त्यांचीही कथा या अंकात आहे असे सांगितले होते म्हणून त्यांची कथा वाचण्याची उत्सुकता होती, मागे एकदा माझी कथा आवडल्याबद्दल त्यांनी फोन करून सांगितले होते. आपणास एखादी गोष्ट आवडल्याचे कळविणे हा त्यांचा स्वभाव आवडला. इतरही वाचकांनी असे काही चांगले आवडले तर फोनवर अगर पत्राने लेखकास कळवावे त्यामुळे त्यांचा हुरूप वाढतो. तसेच संपादकांना सुद्धा बरे वाटते. या अंकातील सर्व मजकूर चांगलाच आहे.

शृंगेरी यात्रा व श्री. चक्रदेव यांचे कैद्याचे वर्णन आवडले. तसेच तुमचा संत मुक्ताबाई हा लेखही आवडला. मीना मराठे यांचा ‘शोनाड’ ही कथा वाचून त्यांचे प्राणीमात्रांबद्दलचे प्रेम दिसून आले.

मानवाच्या जीवनात कोणावर कशी वेळ येईल हे सांगता येत नाही. इचलकरंजी येथील उद्योजक श्री. प्रकाश दाते यांचेवर अशीच वेळ आली. त्यांना बऱ्याच उशिरा मुलगा झाला. पण झालेला मुलगा म्हणजे नुसता मांसाचा गोळा होता, असे हे मूल जगवायचे की नाही असा प्रश्न त्यांना पडणे साहजिकच होते. ओठांच्या ठिकाणी फक्त एक चीर जेथे कापसाच्या बोळ्याने दूध पाजता येई हात पाय व कोणतेही अवयव प्रमाणबद्ध नाहीत. पण प्रकाश दाते यानी हे मूल जगवायचे ठरविले व ते पण अशारितीने की प्रत्येक ठिकाणी ते प्रथम येईल. आणि खरोखर त्यांनी अखंड कष्ट घेऊन त्या मुलाला- प्रथमेषला- असा वाढविला की मासांचा गोळा म्हणून जन्मलेला प्रथमेश आज कॉलेजमधील लायब्ररी संभाळतो. हे सर्व करण्यात त्याच्या आई वडिलांना काय कष्ट पडले त्याची कथा प्रा. सचिन कानिटकर यांनी लिहली आहे. ती वाचून कानिटकरांचे लेखन कौशल्य जाणवते तसेच चित्रकार शिंद यांचे कौशल्य नजरेस येते.

मला भोगावे लागले ते इतरांना भोगावे लागू नये त्यांना मार्गदर्शन या पुस्तकाने व्हावे या उद्देशाने त्यांनी हे पुस्तक विक्रीस ठेवले नाही.

पुस्तक वाचता वाचता यावर काही लिहावे असे मला वाटले व मी परीक्षण लिहिले ते सकाळच्या सप्तरंग मध्ये ४-२-२०१८ रोजी प्रसिद्ध झाले व त्यामुळे भरपूर प्रसिद्धी मिळाली. श्री. दाते मुद्दाम येऊन मला भेटून गेले.

आपला
**वि. म. मराठे** (पृ. २३५), सांगली

---

**मा. संपादक हितगुज**
मुंबई ४०० ०३१
स.न.वि.वि

डिसेंबर २०१८चा रमाकांत विद्वांस याचेवरचा श्रद्धांजली विशेष अंक आवडला. कै. रमाकांत यांच्या विषयी सर्वांनी तळमळीने लिहिलेले लेख वाचून त्यांच्या विषयीचे आपल्या सभासदांचे प्रेम व्यक्त होते.

सदर अंकातील प्रा.भा.ल. महाबळ यांचा अरे विद्वांस ते अहो विद्वांस हा लेख वाचून प्रा. महाबळ व त्यांची मैत्री कशी होती ते समजते व दोघांचा जीवनपट समजतो.

प्रा. भा.ल. महाबळ हे मिरजेचे. ते माझ्यापेक्षा ४-५ वर्षानी सिनीयर आहेत. त्यामुळे मी त्यांना ओळखत होतो पण प्रत्यक्ष गाठ कधी पडली नाही. ते जेथे राहत होते तेथेच रानडे गल्लीत बनहट्टी वाड्यात मी राहात होतो. तेथेच महाबळ वाड्याशेजारी त्यानी बांधलेले टुमदार घर व त्यावरची पां.ल. महाबळ व भा.ल. महाबळ ही नावाची पाटी लक्ष वेधून घेत असे.

प्रा. महाबळ हे अत्यंत हुशार सर्व क्षेत्रात त्यांचे प्राविण्य असायचे. अभ्यासा शिवाय खेळ, वक्तृत्व, कुस्ती इ. मध्ये ते भाग घ्यायचे बेळगाव येथून त्यानी जिंकलेली ढाल अजूनी डोळ्यासमोर आहे. अशा स्पर्धेचा निकाल बघताना दुसरा कोण हे विचारावा लागे. कारण पहिला नंबर यांचाच असे. त्यांचे लिखाणही वाचनीय असते त्यांची विनोदी किस्स्यांची पॉकेट पुस्तके फार लोकप्रिय झाली आहेत.

असे हे प्रा. महाबळ आपल्या मराठे कुटूंबात सहजपणे वावरतात त्यामुळे ते परके वाटत नाहीत. असेच त्यांचे व मराठे प्रतिष्ठानचे संबंध असे दीर्घकाळ राहोत.

आपला
**वि. म. मराठे** (पृ. २३५), सांगली
९४२०६७८९६५

# गाथा मतीमंदाच्या प्रगतीची - कथा घडविणाऱ्या हातांची

• श्री. वि. म. मराठे (पृ. २३५), सांगली
भ्रमणध्वनी : ९४२०६७८९६५

**प्रा**. सचिन कानिटकर यानी लिहलेले हे पुस्तक हातात घेतल्यावर नजर जाते ती एका मुलाकडे. ज्याचे हात पाय अगर कोणतेही अवयव प्रमाणबद्ध नाहीत, ज्याचा उजवा हात एका पुरूषांनी व डाव हात एका महीलेने धरला आहे, ती दोघे त्याला वर ओढतायत व तो मुलगा केवीलवाणे तोंड करून त्यांच्याकडे पहातो आहे अशा चित्राकडे.


वरील चित्रातील मुलाचा केवीलवाणा चेहरा बघितल्यावर कोणीही सहृदय माणसाला मुलाबद्दल सहानभूती वाटल्याशिवाय राहणार नाही अशा या पुस्तकात काय असेल याची कल्पना करीत पान उलटले की तर तशाच चित्राखाली आदरणीय संभाजीराव भिडे गुरुजी यानी लिहलेला श्लोक वाचावयास मिळतो.

लंघे सप्त गिरी, तनूलघु जरी, मुंग्या अखंड धावती।
वाहे जान्हवी वारिधीस मिळण्या, पहाड ओलांडती ।
मुळे अश्मही भेदुनी प्रतिक्षणी, पाण्याकडे धावती ।
यांची तळमळ तीव्र तीव्र असते, लक्षास ओलांडती ।

शेवटची ओळख मूकं करोती वाचालं पंगु लंघयती गिरी अशा वचनाची आठवण देते व ज्यांची तळमळ तीव्र असते लक्षास ओलांडती या ओळीवर नजर स्थिर होते.. जीवनात एखाद्या व्यक्तीवर काय प्रसंग ओढवेल हे सांगता येत नाही. इचलकरंजी येथील दाते यांचेवर असाच प्रसंग ओढवला. व ज्याची तळमळ तीव्र असते लक्षास ओलांडती या वचनाची पूर्तता करण्याचा निश्चय करून तो अमलात आणण्याची मेहनत त्यांना करावी लागली.

आपल्या व्यवसायात चांगला जम बसवत असलेल्या प्रकाश दाते यांचा विवाह जमण्यास वयाची ३२ वर्षे उलटून गेली. उशीरा विवाह झालेल्या दातेंच्या पदरात एक मतीमंद मुलगा जन्माला आला मुलाचा विचीत्र चेहरा, अपुरे वजन, डोळे व तोंडाच्या जागी नुसत्या रेघा. इ. वाचल्यावर मुलगा मतीमंद आहे हे लक्षात येते. या अशा प्रकारच्या मुलाची तपासणी केईएमच्या डॉक्टरनी केल्यावर मुलगा डाउन सिंड्राम आहे याच्यावर शिक्का बसला.

अशा या जिवाच्या ओठांच्या ठिकाणी असलेल्या फटीवर दुधाचा बोळा ठेवला तर काहीतरी पोटात जाणार, अशा या मुलास जगवायचे की नाही हा मोठा प्रश्न होता. पण दाते व मुलाची आई व तीच्या माहेरचे लोक यानी मुलगा जगवायचा याचा निश्चय केला आणि हा वाढवायचा तो सामान्य मुला सारखा नाही तर तो नावाप्रमाणेच प्रथम राहील असा वाढवायचा असे ठरवून. त्याचे बारसे जोरात करून नाव प्रथमेष असे ठेवले.




हे मूल जगवायचे ठरवल्यावर दुसरे होऊ द्यायचे की नाही हा केवढा मोठा प्रश्न होता. त्याबाबतीत अनेक प्रकारे विचार करून दुसरे मूल होऊ द्यायचे नाही असा निर्णय झाला.

प्रथमेषला वरचेवर तपासणी साठी पुण्याला जावे लागे. त्यासाठी पुण्याला फ्लॅट घेतला गेला. वगैरे सर्व वाचून दातेनी सर्व किती निश्चयाने केले हे लक्षात येते.

प्रथमेषला उभे राहता येत नव्हते त्याला स्वतःच्या पायावर उभे करायचे होते त्यासाठी त्याच्या आईने त्याला दोन तास खांबाला बांधून कसे घातले याचे वर्णन व त्याचे चित्र बघून आपल्याही डोळ्यात पाणी येते तर त्या आईने काय मानसिक यातना सोसल्या असतील व तो उभा राहून चालायला लागल्यावर तिला काय आनंद झाला असेल त्याची आपण कल्पनाही करू शकत नाही. तो चालायला लागला, बोलायला लागला, शाळेत जाऊ लागला, संगणक शिकला व नोकरीलाही लागला या प्रत्येक टप्प्यावर आई वडीलानी काय कष्ट घेतले असतील याची कल्पना हे पुस्तक वाचायला घेतल्यास येईल. सर्व काही घडले ते आपल्या कल्पने पलीकडले होते व अशी वेळ कोणावर येऊ नये अशी प्रार्थना आपल्या तोंडी येते. ज्याची तळमळ तीव्र असते लक्षास ओलांडती हे वचन दातेनी सार्थ केले हे लक्षात येते.

अशा या प्रथमेषने आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये भाग घेऊन भारताचे प्रतिनीधत्व केले हे आपणास पुस्तकातील फोटोंवरून लक्षात येईल. प्रथमेषच्या या सर्व वाटचालीस अनेक जणानी हात लावला आहे. मुख्यतः आवाडे कुटुंबीय व त्यांच्या सर्व संस्था यांचा मोठा सहभाग आहे त्या सर्व गोष्टीचा उल्लेख लेखकाने

आपल्या लिखाणात करून ज्याचे श्रेय त्याला दिले आहे.

विशेष श्रेय देणे जरूर आहे ते चित्रकार श्री. विजय शिंदे याना. मुखपृष्ठ व आतील चित्रे त्यानी अशी काही रेखाटली आहेत की चित्र बघताच प्रसंग डोळ्यापुढे उभा राहतो. आणि हे सर्व लिहणारे प्रा. सचिन कानिटकर! त्यांनी हे सर्व इतक्या तळमळीने लिहले आहे की प्रत्येक प्रसंग तंतोतंत डोळ्यासमोर उभा राहिला पाहिजे. असे लिहणे ही एक अवघड गोष्ट असते कोठे अधिक उणे चालत नाही. तो तोल संभाळावा लागतो.

या पुस्तकाचे परीक्षण लिहीणे ही फार अवघड गोष्ट आहे. कारण एखादा प्रसंग वर्णावा तर त्याचा तोलामोलाचा दुसरा बाजूला पडेल ही भिती! म्हणून उभे रहाता यावे म्हणून खांबाला बांधून घालावे लागत होते असे एकच उदाहरण दिले आहे. पुस्तक हातात घेतल्यावर एका पेक्षा एक प्रसंग जवळ रूमाल ठेवून वाचन हाच मार्ग हे पुस्तक वाचण्याचा!

अतिशय सुंदर छपाई, आतील अनेक चित्रे व दाद द्यावी असे आर्टपेपर वरील फोटो हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. या फोटोमुळे छपाईचा खर्च वाढतो. पण ती आवश्यकच होते. प्रथमेषने एक एक पल्ला कसा गाठला याचे चित्रण या फोटोंतून बघायला मिळते.

थोडक्यात मुखपृष्ठावरील प्रथमेष ते मलपृष्ठावरील प्रथमेष याची ही गाथा आहे.

या पुस्तकाबद्दल स्वतः प्रकाश दाते यानी म्हणले आहे की ‘‘या पुस्तकाने छोट्या छोट्या गोष्टीनी आपण पराभूत झालो आहोत असे मानणाऱ्या लक्षावधी निराशाग्रस्ताना प्रकाशाचे गरूड पंख मिळणार आहेत.’’ त्यानी पुढे असेही म्हणले आहे की माझे मूल गतीमंद निघाले पण तेथून आंतरराष्ट्रीय सेलीब्रीटीपर्यंत प्रवासात खूप वाट बघावी लागली. थकणारा प्रवास करावा लागला व भरपूर पैसेही मोजावे लागले हे कष्ट इतरांना भोगावे लागू नयेत म्हणून हे पुस्तक!

या उद्देशाने प्रकाशकाने हे पुस्तक गरजूंपर्यंत जावे म्हणून ते विक्रीस ठेवले नाही.

◆

---

# निमित्त

‘निमित्त’ कोणतेही असो,
पण ते असावेच लागते!

अनादिकालापासून
जग हे असेच आहे मित्रा!
कार्य घडविण्यासाठी जसे
कारण असावे लागते तसे
घटना कोणतीही असो,
ती घडण्यासाठी
निमित्त असावेच लागते!

प्रसंग युद्धाचा असो की, प्रेमाचा
काही फरक पडत नाही मित्रा!
कारण, ते घडण्यासाठीही निमित्त
असावेच लागते!

आपण महाभारताचेच उदाहरण घेऊ

भगवान कृष्णाने अर्जुनाला
गीतेचे तत्त्वज्ञान सांगितले
पण, त्यालाही ‘निमित्त’ होते–
‘पार्था’च्या अवसानघाताचे!

अलीकडे दोन महायुद्धे झाली
तात्कालिक का होईना, पण त्यांनाही
‘निमित्त’ होतेच की!
म्हणून म्हणतो मित्रा–
खरे कारण कोणतेही असो
पण, निमित्त हे असावेच लागते!

प्रेमाचेही असेच आहे
प्रेम करण्यासाठी किंवा
करून घेण्यासाठी
निमित्त असावे लागते–
त्यासाठी,
एक हास्य, एक कटाक्ष
किंवा एखादा स्पर्श ही पुरेसा ठरतो!
कारण, शेवटी ‘निमित्त’ हे निमित्तच असते
पण, ते तर असावेच लागते!

म्हणून म्हणतो मित्रा!
घटनी लहान असो अथवा मोठी
ती महत्त्वाची नसते!
महत्त्वाचे असते ते ‘निमित्त’!
कारण, काहीही घडवण्यासाठी
किंवा न घडण्यासाठीसुद्धा
निमित्त असावेच लागते!

**– विवेक वि. विद्वांस**
मुंबई (दि. २४.०९.२०१८)

# प्रेम की गरज

पतिला पत्नीची गरज आहे
पत्नीला पतिची गरज आहे
म्हणून त्यांचे एकमेकांवर प्रेम आहे ।।१।।

त्यांच्या मुलाना आईबापाची गरज आहे
म्हणून त्यांचे त्यांच्यावर प्रेम आहे ।।२।।

आजोबांना सर्वांचीच गरज आहे
पण त्यांची कुणालाच गरज नाही
म्हणून त्यांच्यावर कुणाचे प्रेम नाही ।।३।।

कर्तव्य पूर्ण करतात सारे पण...
स्नेह मात्र अजिबात नाही ।।४।।

कुटंबात प्रेम असेच राहो वाढो
आजोबानाही त्यात वाटा मिळो ।।५।।

ही ईश्वरचरणी विनवणी

कवि : **मोरेश्वर ल. मराठे**, सांगली
९४२२४२०६६९

# पाकनिपुण ज्ञानेश्वर

• डॉ. सौ. सुमेधा प्र.मराठे (पृ. १२०), वडाळा दूरध्वनी - ०२२-२४१५०८८९

**श्री**ज्ञानेश्वरांच्या निरुपणातला आकर्षक विशेष म्हणजे कल्पनाविलास आणि त्यामुळे ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेला बहर येणे हे ही स्वाभाविकच होय. संपूर्ण ज्ञानेश्वरीत कल्पनाविलासाची नुसती बरसात होताना दिसते. या कल्पना फुलवताना ज्ञानेश्वर सूर्य, सूर्यप्रभा, चंद्र, डोह, मळे, मृगजळ, समुद्र, आकाश, लाटा, तरंग, वारा, वृक्ष, वेली, फुले, फळे, सुवर्ण, अलंकार, दोरी, साप अशी विविध प्रकारची प्रतिमासृष्टी उभी करतात व आपल्या निरुपणाचे सौंदर्य वाढवितात. इतकेच नाही तर संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत स्वयंपाकातील अन्नपदार्थांचा उपयोग, आपल्या निरुपणात उपमा-दृष्टान्तासाठी मार्मिकपणे केलेला आढळून येतो. त्यामुळे निरुपण श्रोत्यांना समजण्यास मदत होते. ही निरुपणे विचाराला नित्यनूतन खाद्य पुरविणारी ठरली आहेत. अगदी ज्ञानेश्वरीतील पहिल्या अध्यायापासून ते अठराव्या अध्यायापर्यंत असे उल्लेख येतात. ज्ञानेश्वरीतील ही थोडी झलक :

*ना तरी शब्दब्रह्माब्धि। मथियला व्यासबुद्धी।*
*निवडिलें निरवधि।* ***नवनीत*** *हे।।*
अध्याय पहिला - ओवी ५१.

*मग ज्ञानाग्नि संपर्के। कडसिलें विवेके।*
*पद आले परिपाकें।* ***आमोदासी*** *।।*
अध्याय पहिला - ओवी ५२.

सर्व वाङ्‌मयाचे मंथन करून व्यासाच्या बुद्धीने हे गीतारुपी अवर्णनीय नवनीत (लोणी) काढले. नंतर हे लोणी ज्ञानाच्या आगीवर विवेकपूर्वक कढविल्यामुळे, कढणी अुत्तम अुतरून त्याचे गीतारूप नाजूक, सुवासिक, खमंग साजूक तूप झाले.

*सलिलीं* ***पय*** *जैसें। एक होउनि मीनलें असे।*
*परी निवडूनि राजहंसे। वेगळे की जे।।*
अध्याय २रा ओवी १२७

पाण्यात दूध मिसळून एकजीव होते परंतु जसा राजहंस ते निवडून निराळे करतो. तसा ज्ञानी ब्रह्म तत्व निराळे जाणतो.

*ना तरि जाणिवेच्या आयणी। करितां* ***दधिकडसणी*** *।*
*मग* ***नवनीत*** *निर्वाणी। दिसे जैसे।।*
अध्याय २ ओवी १२९।।

किंवा ज्ञानाच्या सामर्थ्याने दुधाचे घुसळण केले असता शेवटी जसे लोणी दिसू लागते.



अशा एकूण दृष्टान्तात दही-दूधावर जास्त भर दिलेला दिसतो. श्री ज्ञानेश्वरांच्या सात्विक वृत्तीशी हे साजेसेच म्हटले पाहिजे.

*की* ***भूस बीज*** *एकवट। उपाणितां राहे घनवट।*
*तेथ उडे ते फलफट। जाणों आले।।*
अध्याय २ रा ओवी १३०

धान्य व भुसा ही पाखडली असता धान्य जाग्यावर राहाते व भूसा फोलपट असल्यामुळे उडतो त्याप्रमाणे अर्जुना, विचारी, ज्ञानी, संत लोकांना या मायामय विश्वांत एक सर्वान्तर्यामी गूढ तत्त्व आहे, जे चैतन्य आहे ते समजते.

*''या उपाधिमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत।*
*ते तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती।।''*

हा विचार श्रोत्यांना पटवून देण्यासाठी वरील दृष्टान्च समर्पकपणे ज्ञानेश्वरांनी दिलेले दिसतात.

*''सांगे शूद्रघरीं आघवीं।* ***पक्वान्नें*** *आहाति बरवीं।*
*तीं द्विजें केवीं सेवावी।। दुर्बळु जरी जाहला।।''*
अध्याय ३रा ओवी २२१

अर्जुना, सांग पाहू, शूद्राच्या घरी सर्व प्रकारची पक्वान्नें उत्तम झाली आहेत, पण कितीही दुर्बळ ब्राह्मण झाला, तरी त्याने ती सेवावी काय? किंवा,

*''हां गा **साकर** आणि दूध। गौल्य कीर प्रसिद्ध*
*परी कृमिदोषीं विरुद्ध। घेपे केवीं।।*

अध्याय ३ रा – २२६

अरे, साखर आणि दूध यांची गोडी अवीटच आहे. परंतु जन्तविकाराला ती वाईट आहेत. मग ज्याला जन्ताचा विकार झाला आहे, अशा रोग्याने ती घ्यावी कशी?

...श्रीकृष्ण, अर्जुनाला आपला स्वधर्म जरी कठीण वाटला, तरी तो आचरण्यांतच आपले कल्याण आहे. दुसऱ्याचा आचार दिसायला कितीही चांगला आणि सोपा असला तरी तो स्वीकारण्यास योग्य नाही कारण त्यात हित नाही हे प्रतिपादन करीत असताना वरील दृष्टान्त देताना दिसतात.

अ. ४था–

*आधींचि साखर आवडे। तेचि जरी ओखदां जोडे।*
*तरी सेवावी ना कां कोडें। नावानावा।*

अ. ४ ओवी २१८

आधीच साखर आवडती, आणि त्यांत जर ती औषध म्हणून देण्यात आली, तर ती पुन्हां पुन्हां मोठ्या आनंदाने का खाऊं नये?

*जरी मंत्रेंचि वैरी मरे। तरी वायां कां बांधावी कटारें।*
*रोग जाय **दुधसाखरें**। तरी निंब कां पियावा।।*

अध्याय ४ ओवी २२२

जर मंत्राने शत्रू मरतो, तर हातांत कटार घेण्याचे कारणच काय? जर दूधसाखरेने रोग नाहीसा होत असेल, तर कडूनिंबाचा रस का म्हणून घ्यावा?

याचप्रमाणे मनाला न मारता आणि इंद्रियांना न दुखविता या कथाश्रवणाने आपोआप मोक्ष हाती येतो. म्हणून शक्य तेवढ्या शांतपणाने हा गीतार्थ श्रवण करा, असे ज्ञानदेव सांगत आहेत.

आता हे दृष्टान्त पहा –

*''ना तरी साखरेचा माघौता। बुद्धीमंतपणेही करितां।*
*परि **ऊस** नव्हे पांडुसुता। जियापरी।।*

अ. ८ ओवी २००

अर्जुना, एकदा उसाची साखर केली, म्हणजे मनुष्य कितीही बुद्धिमान व कुशल असला तरी जसा त्याला त्या साखरेचा उस करता येत नाही त्याप्रमाणे ईश्वरतत्वाशी जे समरसून, मिळून गेले आहेत त्यांना पुन्हा जन्म–मरण नाही.

किंवा –

*''म्हणोनि **तुप** होऊनि माघौतें। जेवीं **दूधपण** न येचि निरुतें।*
*तेविं पावोनियां जयातें। पुनरावृत्ती नाही।।*

अ.८ ओवी २०१

एकदा दूधाचे तूप बनल्यावर मग पुन्हा तूपाला दूधपणा प्राप्त होणार नाही, त्याप्रमाणे परमात्मस्वरुप प्राप्त झाल्यावर पुनर्जन्म नाही.

...ऐश्वर्ययोग म्हणजे परब्रह्माचे स्वरुप. त्याचे स्वरुप थोडक्यात असे. हे सर्व जग परमेश्वराच्या अव्यक्त स्वरुपाने व्यापलेले आहे. परमात्म्याच्या ठिकाणी सर्व भूते आहेत, पण परमात्मा मात्र भूतांच्या ठिकाणी नाही कल्पान्ताच्या वेळी सर्व भूते परमात्म्याच्या प्रकृतींत येऊन मिळतात व दुसऱ्या कल्पाच्या प्रारंभी परमात्माच भूते निर्माण करतो. परमात्म्याच्या आश्रयाने प्रकृती म्हणजे माया हे जग निर्माण करते. हे जग म्हणजे कल्पेनाचा खेळ आहे. जोवर कल्पनेचे अस्तित्व आहे, तोवर जगाची प्रतीती आहे. कल्पना संपली की जग संपले. मग उरते ते केवळ ब्रह्म। त्यासाठी ज्ञानेश्वर पुढील उपमा देतात. अ.९ वा ओवी ६४.

*''माझेया विस्तारलोपणाचेनि नांवे। हे जगचि नोहे स्वभावें।*
*जैसें **दूध** मुरालें स्वभावें। तरि तेंचि **दहीं**।।''* ९।६४.

माझ्या विस्ताराची गोष्ट म्हटली, तर सर्व जग म्हणजे मीच असे नव्हे काय? जसे दूध आपल्या स्वभावानुसार विरजले म्हणजे तेच दही होते.

*''आणि घांसाआंतिल हरळु। फेडितां लागे वेळु।*
*ते दूषण नव्हे खडळु। सांडावा की।।''* अ. १३।३३४

हरळु म्हणजे खडा. जेवत असताना घासातील खडा काढण्यास वेळ लागला तर तो जेवणाराचा दोष नव्हे.

ज्ञानेश्वर रसिक श्रोत्यांपुढे गीतार्थाचे निरुपण करीत आहेत. ते निरुपण अधिकाधिक शुद्ध, स्पष्ट, निर्दोष व्हावे म्हणून ते निरनिराळ्या मतांचा उहापोह करण्याच्या भरीस पडताहेत आणि या प्रकारात काही वेळा मूळ श्लोकाचा अर्थ कोठच्या कोठे राहून अवाच्या सवा विस्तार झाला, याची जाणीव त्यांना होऊन ते या बद्दल बाळकाला क्षमा करा अशी विनवणी श्रोत्यांना करताना म्हणतात – अहो, अन्नाच्या घासातला खडा काढताना जरा वेळ लागला, तर तो काही जेवणाराचा दोष नव्हे, कारण खडा हा काढलाच पाहिजे. वाटेत भेटलेल्या ठगाला चुकविण्यात वेळ मोडल्यामुळे मुलाला घरी येण्यास उशीर झाला तर त्याच्यावर आईने रागवावे की निंबलोण उतरून त्याची दृष्ट काढावी?

*''मी चि होईन सुआरू। वोगरीन **उपाहारू**।*
*आपणपें श्रीगुरु। वोंवाळीन।।*

अध्याय १३ ओवी ४२२.

*''जे वेळी देवो आरोगिती। तेव्हां पांतीकरू मीचि पांती।*
*मीचि होईन पुढती। देईन **विडा**।।*

अध्याय १३ ओवी ४२३

गुरुमहिमा, पराकोटीची गुरुभक्ती, गुरुसेवेचा महिमा वर्णन करताना श्री. ज्ञानेश्वर महाराजांनी वरील ओव्यांतून आपल्या भावना प्रकट केल्या आहेत.

मी सैंपाकी (सुआरू) होऊन श्रीगुरुंना सुग्रास जेवणाचा महानैवद्य वाढीन आणि आपल्या आत्म्याने त्यांना ओवाळीन. श्रीगुरु जेव्हा जेवायला बसतील तेव्हा त्यांच्या पंक्तीला मी बसेन आणि जेवणानंतर तयंना विडा देईन.

*''मृत जैसा शृंगारिला। गाढव तीर्थी न्हाणिला।*
***कुडुदुधिया** माखिला। **गुळें** जैसा।।*

अध्याय १३ ओवी ४६९

*''वोसगृही तोरण बांधिले। कां उपवासी **अन्ने** लिंपिले।*
*कुकुंमसेंदुर केलें। कांतहीनेने।*

अध्याय १३-४७०

भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, अंतरंग शुद्ध नसतां बाहेरच्या कर्माचा थाटमाट म्हणजे नुसती शुद्ध फसवणूक होईल. वरपांगी कर्मकांड हे नीरस असते. अंतरंगात ज्ञान असले म्हणजे बाह्यशुद्धी आपोआप लाभते पण वरकर्मी शुद्धि क्रियांनी ज्ञान प्राप्त होत नसते. जसे मढ्याला सजवावे. गाढवाला तीर्थस्नान घालावे, कडू दुध्या भोपळ्याला गुळाने चोपडावे, ओसाड घराला केळीचे तोरण बांधावे, उपास असलेल्या मनुष्यास सुग्रास जेवणाचा आग्रह करावा, विधवेने कुंकु लावावे तशीही वरकर्मे नीरस असतात.

अध्याय १३ ओवी ८४८-८४९

*''जेव्हा सगर्भे वाढिले। तेव्हांचि पोटींचे धालें।*
*तैसे मागिलें पदें बोलिलें। तेंचि होय।।*

अध्याय १३ ओवी ८४८

*वाचूनियां वेगळे। रूप करणें हे न मिळे।*
*जेवि अंवतिलें आंधळें। ते दुजनेसी ये।।*

अध्याय १३ ओवी ८४९

गरोदर स्त्रीला जेवायला वाढले की तिच्या पोटांतील पिंडाला वाढले असेच होते. आंधळ्याला जेवायचे आमंत्रण दिले म्हणजे ते जसा कोणातरी डोळसास बरोबर घेऊन येतो, त्याप्रमाणे अज्ञानाची लक्षणे सांगू लागले की त्याबरोबरच ज्ञानाची लक्षणे आपोआप समजू लागतात. ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात अमानित्वादि ज्ञानाची जी अठरा लक्षणे सांगितली आहेत, ती उलट मार्गाला लावली म्हणजे ती आपोआपच अज्ञानाची लक्षणे होतात. हे स्पष्ट करताना ज्ञानदेवांनी वरील दृष्टान्ताची उदाहरणे दिली आहेत.

...अव्यभिचारी भक्ती म्हणजे काय हे सांगताना भगवान श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना पातळपणा म्हणजेच पाणी, अवकाश म्हणजेच आकाश गोडी म्हणजेच साखर, ज्वाळा म्हणजेच अग्नि, किंवा मुरलेले दूध म्हणजेच दही, तूप जरी थिजले तरी ते 'तूपच' तसे हे समस्त विश्व म्हणजेच 'मीच' होय. म्हणून पहिल्या प्रथम मी ही विश्वभावना नष्ट झाली पाहिजे आणि मग 'माझा लाभ' व्हावा, अशांतला मुळीच प्रकार नाही. कारण ते सर्वच काही 'मी' आहे. अशा रीतीने 'माझे ज्ञान होणे' म्हणजेच माझी अव्यभिचारी भक्ती. या ज्ञानांत काही भेदभाव अगर कमीपणा येईल, तर तोच व्यभिचार म्हणून, सर्व भेद सोडून, अगदी एकाग्र मनाने आपणासकट मला जाणावे. या ओव्या खालीलप्रमाणे -

*'कां द्रवपणचि नीर। अवकाशचि अंबर।*
*गोडी तेचि **साखर**। आन नाही।।*

अध्याय १४ ओवी ३७४

*किंवा 'नाना **दूध** मुराले। तेंचि **दहीं**।।*

अध्याय १४ ओवी ३७६

*''**घृताचे** थिजलेपण। न मोडिता **घृतचि** जाण।''*

अध्याय १४ वा ३७८

अध्याय १५ वा -

*जाले **इक्षुरसाचे** ढाळ। तीर **लवण** देणें किडाळ।*
*जे संवादसुखाचे रसाळ। नासेल थितें।।*

अध्याय १५ ओवी ४५७

कोणत्याही पदार्थाला मीठ लावले असता चव येते, अन्नपदार्थात मीठ हे महत्त्वाचे परंतु उसाच्या रसापासून बनविलेल्या गूळाच्या ढेपीला मीठ लावले असता गूळाच्या गोडीचा नाश होतो. तसे...

...ऐक्याचे प्रेम चांगले पण संवादाच्या वेळी ते बाधा आणेल या हेतूने श्रीकृष्ण अर्जुनाच्या प्रेमाचा मोह आवरून धरतात आणि अर्जुनाला प्रश्न विचारायला सांगतात.

*अ. १६वा*

*''ना तरि ते नाना रसीं। रिघोनि दर्वी जैसी।*
*परि रसस्वादासी। चाखों नेणे।।''*

अध्याय १६ ओवी २४८।।

स्वयंपाकाची दर्वी म्हणजे पळी किंवा डाव जशी जेवणाच्या वेगवेगळ्या पदार्थात संचार करते पण त्या पळीला अन्नपदार्थाचा रसास्वाद घेता येत नाही त्याप्रमाणे कर्तव्य काय व अकर्तव्य काय याबाबतीत अज्ञानी माणसाची लक्षणे अर्जुनाला श्रीकृष्णाने सांगितली आहेत :-

**खिचडी**

*''तैसे पापपुण्याचे **खिचटें**। करोनि खातां बुद्धिचेष्टे।*
*कडु मधूर न वाटे। ऐसी जे देशा।।''*

१६-२५१

ज्ञानेश्वरीतील खिचडी ही उपवासाला चालणारी साबुदाण्याची खिचडी नाही तर डाळ-भात मिश्र खिचडी आहे.

...पाप-पुण्याची खिचडी बनवून अज्ञानी माणूस खात असतो. त्याच्या बुद्धीला कडु आणि गोड काहीच समजत नाही.

*''नाचतया पुण्यगिरी। चित्‌भैरवाच्या खापरीं।*
*मन पवनाची **खीच** पुरी। वाढूनियां।।''*

अध्याय १८ ओवी १०४०

- योगाभ्यास दृढ होणे म्हणजेच चैतन्य, मन व प्राण यांची खिचडी होय.

***कणिकीतें*** *जैसे पाणी। तैसेंचि **मीठ** बांधया आणि।*
*तेतुलीच मेळवणी। रसांतरांची।।*

अध्याय १७ ओवी १४०

- कणिकेचा गोळा करण्यास जितके पाणी लागते तितकेच त्यात मीठ घालण्याचे काम रजोगुणी करतो.

*आधींच द्रव्यें दुरमुरीं। वरी परवडिजती **मोहरी**।*
*जियें घेतां होती धुणारी। नाकें तोंडे।।*

अध्याय १७-१४६

आधीच पदार्थ मूळचेच झणझणीत त्यात त्याला मोहरी लावून त्याचे असे अनेक प्रकार बनविले जातात की त्यांचे सेवन केले असता नाकातोंडातून वाफा निघून जिभेची नुसती हायहाय होते.

*''हे असो उडों आगीतें। म्हणे तैसे **राइते**।*
*पाढियें प्राणापरोतें। राजसासि गा।।''*

अध्याय १७।१४७

इतकेच नव्हे तर साक्षात् आगीलाही मागे सारील असे झणझणीत व जळजळीत रायते रजोगुणी पुरुषाला प्राणाहूनही आवडते, प्रिय असते.

*''जैसे जीवनाची उदक। परि विषीं होय मारक।*
*कां **मिरयांमाती** तीख। उसीं गोड।।''*

अध्याय १७ वा ओवी ६८

पाणी हे स्वभावतःच जगवणारे पण विषाने युक्त झाले की विष होते. मिऱ्यांशी युक्त झाले की तिखट होते. तर उसाने युक्त झाले की गोड होते. त्याचप्रमाणे हा जीव अलिप्त, निर्दोष राहूच शकत नाही. त्याला सत्व, रज, तम हे त्रिगुण वेढतात.

...स्वधर्म श्रेयस्कर हे पटवून देताना भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगताहेत,

*''अगा पाणियाहूनि बहुवें। **तुपीं** गुणी कीर आहे।*
*परी मीना काय होये। असणे तेथ।*

अध्याय १८-९२९।।

अरे, पाण्यापेक्षा तूपामध्ये बहुमोल गुण आहेत, म्हणून काय मासा तुपांत राहू शकेल?

*कां **साळीचा** कणु म्हणे। मी नुगवें **साळीपणे***
*तरी आहे आन करणें। स्वभावासी।''*

अध्याय १८ ओवी १२८७

अर्जुन म्हणतो मी युद्ध करून आप्त जनांना मारण्याचे पाप करणार नाही तेव्हा श्रीकृष्ण म्हणतात, आधी तू झुंजाला सिद्ध व्हावेस, मग झुंजण्यासाठी हाती शस्त्र धरावे, आणि इतके केल्यावर ''मी झुंजणार नाही'' हे म्हणणे सगळे विचित्र! ह्या म्हणण्याला काही अर्थ नाही. ते सर्व फोल आहे. अरे, भाताचा बीजकण असे म्हणेल कां, मी भातासारखा रुजणार नाही व वाढणार नाही. संस्कार आणि स्वभाव असे दृढ असतात. तेव्हा तुझा स्वभाव तुला लढायलाच लावणार, अर्जुना, शौर्य, पराक्रम, तडफ तत्परता इ. गुण तुला स्वभावाप्रकृतीनेच दिले आहेत ते तुला स्वस्थ बसू देणार नाहीत.

*''जैसी भोजनाच्या व्यापारी। क्षुधा जिरत जाय अवधारीं।*
*मग तृप्तीच्या अवसरीं। नाहींच होय।।''*

अध्याय १८ - ११००।।

जेवण करीत असताना प्रत्येक घासागणिक भूक कमी कमी होत जाते व तृप्तीनंतर ती नाहीशी होते. तसे बोध झाल्यावर अज्ञान संपते. त्याचप्रमाणे,

*''बाळकातें वोरसें। माय जें जेवऊं बैसे।*
*ते तया ठाकती तैसे। घांस करी।।*

अध्याय १८ ओवी १६९७

*''**दधीजलाचिया** घुसळणा। व्यापार सारिखेचि विचक्षणा।*
*वाळुवि तिळा घाणा। गाळणे एक।।*

अध्याय १८ ओवी ९४०।।

बा, सुज्ञ अर्जुना, पाणी घुसळणे आणि दही घुसळणे या दोन्ही क्रिया एकच, ?? परिणाम भिन्न, दह्यामुळे ताक, ताकापासून लोणी, तूप मिळते, तीळापासून तेल मिळते. तसे कोणत्याही कर्माचरणांत श्रमश्रांयास हे असतातच मग ते स्वधर्माचरणांत असले म्हणून तो स्वधर्माचाच दोष म्हणावा का?


... अशा प्रकारे एखाद्या सुगरणीप्रमाणे ''पाकनिपुण'' ज्ञानेश्वरांनी आपली निरुपणे सर्वसामान्यांना पटवून देण्यासाठी स्वयंपाकातील पदार्थांचा खूबीने उपयोग करून घेतला आहे.

# साभार पोच




### भवानी भारती

**लेखक :** रचनाकार महर्षी अरविंद
**मराठी अनुवाद :** श्री. अरूण भिकाजी मराठे (निवृत्त जिल्हा न्यायाधिश)
**प्रकाशक :** विश्व संस्कृत प्रतिष्ठानम्, वडोदरा - गुजरात
**पृष्ठसंस्था :** ११२
**प्रथमावृत्ती :** १५ ऑग्रस्ट २००५
**मूल्य :** ५०/- रुपये




### रणझुंजार देवता मॅडम कामा

**लेखिका :** श्रीमती मंदाकिनी वासुदेव भट
**प्रकाशक :** भरारी प्रकाशन
**द्वितीय आवृत्ती :** २१ ऑगस्ट २०१८
**पृष्ठसंख्या :** ८०
**मूल्य :** रुपये १२५/-
**संपर्कासाठी दूरध्वनी :** ९८७०६१७१२४/९९३०३०३५९६




### गाथा 'गतिमंदाच्या प्रगतीची' कथा 'घडविणाऱ्या हातांची'

**लेखक :** सचिन कानिटकर, सांगली
**प्रथमावृत्ती :** ऑगस्ट २०१७
**पृष्ठसंख्या :** ११२
**मूल्य :** ६०/- रु.
**संपर्कासाठी दूरध्वनी :** (०२३०)२४३२५९४
**भ्रमणध्वनी :** ९८९०१८७८८३




### वधुवर माहिती पुस्तिका २०१८

कोल्हापूर चित्पावन संघ
**प्रकाशन :** विजयादशमी दि. १८ ऑक्टोबर २०१८
**दूरध्वनी :** ०२३१-२५४६२२५
**प्रेषक :** श्री. नंदकुमार मराठे, कोल्हापूर
**दूरध्वनी :** (०२३१) २५४१८२३

---

**BOOK POST**

If undelivered, Please return to

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.**

त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : hitguj@marathepratishthan.org • वेबसाईट : www.marathepratishthan.org